अमृत कुंभ

वर्ष १७ | अंक ५ | डिसेंबर २३ - जानेवारी २४ | मूल्य रु. १४/-

शांतीवन (आबू रोड) : बिल्डर प्रा. बाबासाहेब भोसले यांना ईश्वरी भेटवस्तू देताना राजयोगिनी ब्र.कु. जयंती दीदी, राजयोगी मृत्युंजय भाई व ब्र.कु. दिलीप

येवला : नक्षत्र काव्य व साहित्य मंचातर्फे आयोजित कार्यक्रमात नक्षत्र नवदुर्गा पुरस्कार घेताना ब्र.कु. नीता

वर्धा : दीपावली निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना आमदार प्रा. पंकज भोयर, विदर्भ साहित्य सम्मेलन अध्यक्ष प्रा. प्रदीप दाते, ब्र.कु. माधुरी, ब्र.कु. मधु व अन्य मान्यवर

शेगाव : म्युझियम पाहिल्यानंतर ग्रुप फोटोत इंजिनियरिंग कॉलेज स्टाफ, विद्यार्थी, प्राचार्य प्रा. दंदे, प्राचार्य प्रा. बिलाल, ब्र.कु. शारदा व अन्य

नांदेड : पोखरणी कृषी विज्ञान द्वारा आयोजित कार्यक्रमात शाश्वत योगिक शेती व अध्यात्म यावर मार्गदर्शन करताना ब्र.कु. प्रणिता

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

वर्ष १७, अंक ५. डिसेंबर २०२३ – जानेवारी २०२४

अंतरंग

१.	संपादकीय – ईश्वर नियुक्त – प्रजापिता ब्रह्मा	२
२.	पवित्र गृहस्थाश्रमाचे प्रणेता : राजयोगी भ्राता रमेश	४
३.	सय बाबांची (कविता)	७
४.	अलौकिक आकाशवाणी केंद्र आणि मी	८
५.	आरोग्य रहस्य – झोप आणि पचन	११
६.	निर्मल आश्रम	१२
७.	बोधकथा (कथा – २)	१४
८.	पसायदान (भाग – ५)	१६
९.	नास्तिक कोण आणि खरा आस्तिक कोण?	१७
१०.	परीकथा (भाग – १२)	१९
११.	मन वळवा	२०
१२.	वाचन संस्कृती	२२
१३.	प्रश्नोत्तरे (भाग – ५)	२४
१४.	रोजचे महाभारत	२६
१५.	प्रभुप्रेम म्हणजेच राजयोग	२७

मुखपृष्ठाविषयी

ॐचे विविध अर्थ वेदकाळापासून आपण करत आलो. एखाद्या ग्रंथनिर्मितीच्या आरंभीदेखील ॐ नमो जी आद्या अशी रचना पहायला मिळते. ॐ म्हणजे आत्मा असा सरळ सोपा अर्थ शिवपित्याने प्रजापिता ब्रह्माबाबांच्या द्वारे १९३७च्या सुमारास प्रथम सांगितला. साधनेचा पहिला टप्पा म्हणजे या अर्थाच्या स्वरूपात स्थित होणे. आपण शरीर नसून एक चैतन्य आत्मा आहोत ही सखोल अनुभूती घेणे हीच पहिली पायरी. ब्रह्मा बाबांसोबत सर्व ब्रह्मावत्स ॐध्वनी घोष करुन आत्मभानात स्थित होत. यामुळेच सत्संगाला 'ॐ मंडळी' नावाने पहिली ओळख मिळाली. ब्रह्मा बाबांनी आपली परमोच्च आध्यात्मिक स्थिती १८ जानेवारी १९६९ रोजी गाठली. या सगळ्याचे स्मरणरंजन मुखपृष्ठात अभिप्रेत आहे.

– प्रकाशिका

फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.

संपादकीय ...

Brahma Baba 1937

ईश्वर नियुक्त - प्रजापिता ब्रह्मा

या सृष्टिवरील कालपटलावर एकवार नजर फिरवली तर अनेकानेक महापुरुष, धर्मपिता, धर्मनेता आणि संतमंडळी होऊन गेल्याचे आढळते. या सगळ्यांत एक अलौकिक वेगळे तेजस्वी व्यक्तिमत्त्व होऊन गेले त्यांची आज आपण ओळख करून घेणार आहोत. सर्वसामान्य माणसं जे व्यतीत करतात ते जीवन असतं; पण असामान्यांचं असतं ते चरित्र. ज्यात चारित्र्य ओतप्रोत भरलेलं असतं ते चरित्र. ज्यांच्याद्वारे परमात्मा शिवाने हे कार्य आरंभिले त्या 'दादा लेखराज' म्हणजेच 'प्रजापिता ब्रह्माबाबा' यांच्या चरित्राचा हा अल्पसा परिचय आहे.

वर्ष १८७६ मध्ये दादा लेखराज यांचा जन्म सिंध प्रांतातील एका 'कृपलानी वैष्णव' घराण्यात झाला. त्यांचे वडील शालेय शिक्षक होते. लहानपणापासून दादांना देवा-धर्माची आवड होती. त्यांची आध्यात्मिकतेची रूची अशी काही होती की घराजवळच्या एका गुरुद्वाराची देखभाल करण्याचे काम त्यांच्याकडेच सोपविण्यात आले होते. पुढे युवावस्थेत प्रवेश केल्यावर त्यांना कोलकात्यातील (पूर्वीचे कलकत्ता) एका जवाहिऱ्याच्या पेढीवर नोकरीची संधी प्राप्त झाली. सचोटीचा व्यवहार व निर्मळ मनाने कष्ट करणाऱ्या सज्जन मुलाला, त्याचे व्यवहार कौशल्य बघून भागीदारी करण्यापर्यंत मजल मारता आली. अतिशय कमी वयात दादा लेखराजांनी रत्नपारखी व एक सत्शील व्यक्ती म्हणून नावलौकिक कमावला.

सर्वजण त्यांना प्रेमाने 'लखीबाबू' संबोधत. स्वातंत्र्यपूर्व काळात राजे महाराजे व संस्थानिक आपापली बस्तानं सांभाळत होते. या निमित्ताने लखीबाबूंची ऊठबस या मोठमोठ्या मंडळींशी होई. एरव्ही पर्दानशीन असणाऱ्या राजस्त्रिया लखीबाबूंशी शुद्ध प्रेमाच्या, घरच्या माणसाप्रमाणे मनमोकळ्या होऊन भेटत असत. उदयपूरचा राजा काय किंवा नेपाळचा राजा काय, असे अनेकजण लखीबाबूंच्या संपर्कात होते. पण अशा नवकोट नारायणाची बुद्धी मात्र अहंकाराचा वारा लागून कधी दूषित झाली नव्हती. सर्व प्रकारच्या लोकांच्या संपर्कात येऊनही दादा लेखराजांनी आपल्या जीवनातल्या उच्च कोटीच्या धारणा कधी सोडल्या नाहीत. रोज गीता पठण केल्याशिवाय ते झोपत नसत. त्यांच्या मनांत भक्तिभाव व ज्ञानपिपासा अगाध होती. या कारणामुळे की काय त्यांनी एक नव्हे, दोन नव्हे चक्क बारा गुरु केले होते.

कुठल्याही मेजवानीच्या प्रसंगी लखीबाबूंचे शुद्ध आचरण वेगळे असे उठून दिसत असे. अनेक मंडळी म्हणत, 'लखी बाबू भगवान ने गलतीं की, हमारे बदले आपको राजा बनाना चाहिये था । ते स्वत: कधी मद्य-मांसाहारी गोष्टींना स्पर्शही करत नसत व व्यवहार राखतानाही कुणाला या गोष्टी देऊ करत नसत.

अशा प्रकारे लखीबाबूंचे अतिशय आदर्श असे गृहस्थाश्रमी जीवन व्यतीत होत होते. पत्नी, मुलं, सुना असा सुखी परिवार होता. अशात १९३६ साल उजाडलं, लखीबाबूंच्या साठीचा काळ सुरू झाला आणि त्यांचे हिऱ्याच्या व्यापारातील मन उडू लागले. मनांत कुठेतरी वैराग्याचा झरा वाहू लागला. स्वत:मधे होणारे बदल पाहून ते अन्तर्मुख होऊ लागले. अशाच एका दिवशी मुंबईत असताना ते एका मंदिरातल्या सत्संगात बसले होते. त्यातही त्यांचे मन रमेना व ते तिथून उठून आपल्या घरी खोलीत येऊन एकांतात बसले. या दरम्यानच त्यांना अलौकिक अशा देहातीत अवस्थेचा अनुभव होत होता. त्यातूनच पुढे त्यांना चतुर्भुज विष्णूचा साक्षात्कार झाला. ते श्रीविष्णूचे निस्सीम भक्त होते. या भावावस्थेत त्यांना अनुभवायला मिळालं की, श्रीविष्णू म्हणतायत - अहं चतुर्भुज तत् त्वं ।

झाल्या प्रकाराने त्यांच्या मनांत विचारांचं काहूर माजलं की हे काय घडतंय आपल्या बाबतीत. एकाच वेळेस देहातीत आनंदमय अवस्था व घनगंभीर वैराग्य या दोहोंचा समुच्चय त्यांच्या ठायी दिसू लागला. या अनुभवाबाबत त्यांनी आपल्या गुरुशी चर्चा केली; पण गुरुद्वारेही याची उकल झाली नाही. असेच दिवस पुढे जात होते आणि त्यांच्या जीवनात जणू साक्षात्कारांची मालिकाच सुरू झाली. एका साक्षात्कारात त्यांना दिसलं जणू या सृष्टिवर महाविनाश घडून येतोय, त्या उत्पातात अनेक जीवन नाहक बळी जात आहेत हे पाहून त्यांचे मन कळवळलं आणि सहजोद्‌गार निघाले, 'हे परमेश्वरा माझ्याच्याने हे पाहवत नाही. बंद कर.' त्यानंतरचा अनुभव होता की महाविनाशानंतर सृष्टिवर देवतांचे दिव्य आगमन होत आहे. अशा सृष्टिच्या निर्मितीची जबाबदारी तुला पेलायची आहे. भावावस्थेतील अनुभवांची ही गुंतागुंत अधिकच वाढत जात होती.

अशा वातावरणात 'तो' दिवस उजाडला. लखीबाबू आपल्या घरी गुरुंना पाचारण करीत व त्यांचे सत्संग इतरांनाही घडवीत. गुरुविषयी इतकी श्रद्धा असे की गुरु प्रवचनाला बसले की लखीबाबू त्यांच्या समोरून उठत नसत. पण 'त्या' दिवशी लखीबाबू उठले व बाजूच्या खोलीत गेले. त्यांच्या पाठोपाठ त्यांची पत्नी व सूनही उठल्या, काय झाले ते जाणण्यासाठी. पाहतात तो काय! लखीबाबूंच्या अवतीभवती अलौकिक दिव्य असा लालसर प्रकाश पसरला होता. त्यांचे मस्तक व भालप्रदेशही त्याच तेजाने उजळून गेले होते. त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले. निजानंद स्वरुपं शिवोऽहं, ज्ञानस्वरूप शिवोऽहं शिवोऽहं प्रकाशस्वरूपम् शिवोऽहं शिवोऽहं. लखीबाबूंचा अनुभव होता की कुणीतरी शक्ती माझ्या मुखाद्वारे बोलत आहे. 'बोलविता धनी' कुणीतरी वेगळाच आहे. या अनुभवाचे श्रेय त्यांच्या गुरुचेही नव्हते. मग लखीबाबू हळूहळू भक्तिमार्गातून ज्ञान मार्गाकडे वळू लागले. त्यांच्या घरातील मंडळींना त्यांच्या मुखाद्वारे बाहेर पडणाऱ्या गीताज्ञानाचा लाभ मिळू लागला. सर्वजण एकत्र बसत व लखीबाबू 'ओम' चा ध्वनी करत. अनेकांना आपापल्या इष्ट देव-देवतांचा साक्षात्कार होई. हळूहळू आसपासच्या परिसरातील अनेक जण येऊ लागले व अनेकांना अशी दिव्यानुभूति होऊ लागली. करतां करतां त्या सगळ्याला सत्संगाचे रूप लाभले. सगळे मिळून प्रथम 'ओमकार' करीत म्हणून लोक त्यांना 'ॐ मंडळी असे संबोधू लागले. त्यांच्या मुखाद्वारे परमात्मा शिवाने आपले सत्य गीताज्ञान प्रकट करायला सुरुवात केली. 'हे शरीर नश्वर आहे, आपण एक चैतन्य आत्मा आहोत, मनुष्यात्मा एक शरीर सोडून दुसरा देह मानवाचाच धारण करतो, परमेश्वरही निराकार ज्योतिर्बिन्दू आहे. अशी अनेक अमृतवचने ऐकून सत्संगात येणाऱ्यांचे देहभान हरपू लागले. परमात्म्याने त्यांचे नाव, 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवले. संपूर्ण सृष्टिवर पित्याप्रमाणे प्रेम करायचे आहे व या ज्ञानाचा प्रसार करायची जबाबदारी शिरावर धारणे करायची आहे म्हणून कर्तव्यवाचक नाव - प्रजापिता ब्रह्मा! तेव्हापासून सर्वजण त्यांना प्रेमाने 'बाबा' किंवा ब्रह्माबाबा' म्हणू लागले.

आयुष्याच्या सुरुवातीपासूनच ब्रह्माबाबांना (पूर्वीचे लखीबाबू) माता-भगिनींबद्दल नितांत आदर, सन्मान होता. त्याचं एक उदाहरण म्हणजे भक्तिमार्गात असताना बाबांनी चित्रकाराकडून वेगळे चित्र काढून घेतले होते. त्यात श्रीविष्णूंचे पाय दाबणारी लक्ष्मी नव्हती तर ती त्यांच्या बाजूला तितक्याच आदराने बसलेली दाखविली होती. या पार्श्वभूमीवर बाबांनी, माता-भगिनींचे एक विश्वस्त मंडळ (ट्रस्ट) बनविले व आपली सर्व संपत्ती त्या मंडळाकडे सुपूर्त केली. आजपर्यंत अनेक आध्यात्मिक धुरिणींनी स्त्रियांना शिष्या बनविले, सन्मान दिला, देवीतुल्य मानले; पण अध्यात्माची धुराच त्यांच्या हाती सोपविणारे हे लखीबाबू कदाचित् एकमेवाद्वितीयच. असे उदाहरण इतिहासात सापडणे कठीण वाटते. ब्रह्माबाबांच्या मुखारविंदातून शिवाने उच्चारलेली अमोलिक वचने ऐकून अनेकांची ज्ञानतृष्णा तृप्त होऊ लागली.

गीतेतल्या वचनांप्रमाणे काम-क्रोधादि विकारांचा त्याग करून या मार्गावर पुढे चालण्यास माता-भगिनी सज्ज झाल्या आणि समाजात हलकल्लोळ उडाला. गृहस्थाश्रमी माताही संपूर्ण पवित्रतेचं पालन करू पाहत होत्या ही एक क्रांतिकारी घटना होती. आजपर्यंत असं कधी घडलं नव्हतं, पाहिलंही नव्हतं. ज्यांना त्या ज्ञानाची गोडी लागली व साधनेद्वारे सहज देहातील अवस्था अनुभवास येत होती त्या माता भगिनी ठाम होत्या; पण अनेकांच्या घरच्यांचे विरोध व अत्याचार सुरू झाले. काही कोर्टकज्जे सुद्धा ओम्

(पृष्ठ क्र.१० वर)

पवित्र गृहस्थाश्रमाचे प्रणेता : राजयोगी भ्राता रमेश

ब्र.कु. हेमंत, शांतिवन, आबू रोड

गीतेत काम विकाराला महाशत्रू म्हटलंय. गृहस्थाश्रमी 'काम' विकार जिंकणे कठीण मानले जाते. 'आग आणि कापूस एकत्र राहू शकत नाहीत' असे मानून घर त्यागून साधक वनात गेले. मोठमोठे, ज्ञानी-ध्यानी कामुकतेच्या प्रबल प्रवाहात वाहून गेले, परंतु धर्मपत्नीच्या सोबत राहून ही आजीवन पवित्र राहणारे 'राजयोगी भ्राता रमेशजींनी' योगबल व दृढ इच्छाशक्तिने काम महाशत्रूस परास्त केलं. विश्व इतिहासात 'काम जीते जगत जीत' बनणारे आदर्श उदाहरण ठरले. पवित्रतेचा धर्म व मर्म उत्तम रीतीने जाणून रमेश भाई व उषा बहिनजींनी आजीवन ब्रह्मचर्य पालन करायचं व्रत घेतलं आणि दिव्य-विवाह करून पवित्र गृहस्थ-आश्रमाचा पाया रचला. मुंबई सारख्या मायानगरीत राहूनही चिखलात उमलेल्या कमळासमान त्यांचं पावन जीवन पवित्रतेला समर्पित होतं. कामुकतेच्या युगात रमेशजी, खरं तर काम विकाराच्या वादळात पवित्रतेचा किनारा दाखविणारे सजीव लाइट हाऊस अर्थात् दीपस्तंभच होते!

गुजरात प्रांतातील भावनगर येथे भक्तिप्रधान कुटुंबात ५ फेब्रुवारी १९३४ रोजी भ्राताजींचा जन्म झाला. वडिलांचं नाव होतं 'श्री नानालाल शाह' तर मातोश्रींचं नाव होतं 'शांतादेवी!' भ्राताजींनी बालपणातच रामायण, महाभारत व भागवत ग्रंथाचं सखोल वाचन केलं, त्याचबरोबर त्यांनी पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यासही केला. शालेय जीवनात प्रतिभावंत बुद्धिमान विद्यार्थी असलेल्या रमेशजींना बारावीपर्यंत शिष्यवृत्तीही मिळायची. ती रक्कम वडिलांच्या इच्छेनुसार भाईजी गरीब विद्यार्थ्यांना वाटून देत. भाईजींना खेळाचीही विशेष आवड होती. भाईंनी मुंबई विश्वविद्यालयात बी.कॉम. व एल.एल.बी.ची डिग्री प्राप्त केली. सन १९५७ मधे चार्टर्ड अकॉउन्टच्या परीक्षेत संपूर्ण भारतात प्रथम स्थान पटकावून सुवर्ण पदकही मिळवलं. सी.ए. पास केल्यानंतर मुंबई विश्वविद्यालयाच्या कॉलेजमधे फिलासॉफी व अकॉउन्टंसीचे प्राध्यापक बनले अन् पांडुरंग शास्त्री आठवल्यांच्या तत्त्वज्ञान विद्यापीठात त्यांनी मानद सेवा देखील केली.

सन १९५२ मधे काही ब्रह्माकुमारी बहिणी ईश्वरी सेवेसाठी मुंबईत गेल्या, त्यांच्या संपर्कात शांतामाता (रमेश भाईंच्या मातोश्री) आल्या. तेव्हा आईमुळे १९ सप्टेंबर १९५२ रोजी भ्राता रमेशजी ब्रह्माकुमारी भगिनींना भेटले व सन् १९५३ मधे मातेश्वरी जगदम्बा सरस्वतींशी भ्राताजींची भेट झाली. ब्रह्माबाबा किडनी स्टोनच्या ऑपरेशनसाठी मुंबईत गेले असतांना हॉस्पिटलमधे बाबांशी भाईंचं मधुर मिलन झालं. पिताश्रींची शांत मुद्रा, उन्नत भाल, तेजस्वी मुखारविंद व प्रभावशाली मनमोहक व्यक्तिमत्व बघून रमेशजी सम्मोहित झाले! पलंगावर पहुडलेल्या बाबांना पाहताच त्यांना वाटलं, जणू अजिंठा-एलोरा गुफेत शीलेवर पहुडलेल्या गौतम बुद्धांनाच न्याहाळत आहोत! त्यांनी विचारलं, 'बाबा आपण कसे आहात?' त्यावर बाबा उत्तरले, 'फार छान!' ते ऐकून आश्चर्याने भाई म्हणाले, 'बाबा, तुमचं तर ऑपरेशन झालंय ना!' तेव्हा बाबा म्हणाले, 'ऑपरेशन माझं नाही, शरीराचं झालंय!' हे सांगून बाबांनी आत्म्याचा पहिला धडा समजावला. रमेश भाईंनी जुलै १९५७ मधे ब्रह्माबाबांना मुंबईत यायचं आग्रहाचं निमंत्रण दिलं अन् साडे चार महिन्यांसाठी फ्लॅट बुक केला. परंतु बाबांनी चारच महिने रहायचं कबूल केलं. तेव्हा रमेश भाई बाबांना म्हणाले, 'बाबा ड्रामा सर्वशक्तिवान आहे, तुम्हाला थांबावंच लागेल.' बाबा म्हणाले, 'नाही, नाही, चार महिनेच राहीन.' बाबा-मम्मांचे मुंबईत आगमन झालं. रोज मम्मा आधी प्रवचन करत, त्यानंतर बाबा ज्ञानमुरली ऐकवत. चार महिने कसे झटकन सरले, कळलंच नाही! विश्वकिशोर भाऊंनी बाबांना शनिवारी डॉक्टरांकडे

तपासणीसाठी नेलं, तेव्हा रक्ताची तपासणी करुन औषध मुरू करू असं सांगून डॉक्टरांनी सोमवारी रक्त तपासणी करायला सांगितलं, खरं तर त्याच दिवशी निघायचं होतं. तीन दिवसांनंतर शुक्रवारी रिपोर्ट मिळणार होता. म्हणून बाबांना शुक्रवारपर्यंत थांबावं लागलं. भाईंनी शनिवार व रविवारच्या सुट्टीच्या दिवशी भाऊ बहिणींना भेटण्याची विनंती केली, बाबा ते टाळू शकले नाहीत. बुक केलेल्या फ्लॅटचे काही दिवस बाकी होते आणि खरेच बाबांना पूर्ण साडे चार महिने राहावं लागलं, तेव्हा हसत-हसत बाबा म्हणाले, 'होय रमेश, ड्रामाच सर्वशक्तिवान आहे!'

भ्राता रमेशजी व उषा बहनजी ज्ञानमार्गात पदार्पण करण्याआधी पांडुरंग शास्त्रींचे अनुयायी होते. रमेशजींनी शास्त्रीजीं मार्फत उषाजींना गंधर्व विवाहाचा प्रस्ताव मांडला. त्यांनी गृहस्थाश्रमी बनल्यावरही काही काळ पवित्रतेचे व्रत घेतले होते. ब्रह्माबाबांना पवित्रता अतिशय प्रिय होती. ते विश्वात ईश्वरी ज्ञानाचा प्रत्यक्ष पुरावा देऊ इच्छित होते, त्यामुळे बाबा दाम्पत्यांना गृहस्थाश्रमी राहून ब्रह्मचारी राहायची प्रेरणा देत. रमेशभाईंचे व्रतस्थ जीवन ब्रह्माबाबांच्या शिकवणुकीस अनुकूल व पूरकच ठरले. सन १९६१ मधे रमेशजी सहकुटुंब आबूत आले, तेव्हा ते यज्ञाचे सहयोगी होते. शास्त्रांच्या ज्ञानाचा नशा असल्याने, पूर्ण निश्चय नव्हता. आठ-दहा दिवस बाबांच्या सोबत राहिले, पण मन तेवढं रमलं नव्हतं. मुंबईत परत जाताना निरोप द्यायला, बाबा पाण्डव भवनच्या मागील गेटच्या रस्त्याने वटवृक्षापर्यंत आले, तेव्हा पिताश्रींच्या नेत्रांमधे स्फटीकासमान प्रेमाचे दोन बिंदू चमकले. ते अनमोल स्नेह-मोती पाहून रमेश भाईंच्या मनात वीज चमकली, अंतःकरणात चैतन्यता जागी झाली, हृदयाचे ठोके तीव्र झाले अन् क्षणभरातच त्यांना दृढ निश्चय झाला पिताश्रींचे अंतःकरण किती निर्मळ अन् प्रेम सम्पन्न आहे! इतकी महान व्यक्ती असूनही त्यांच्यासारख्या सामान्य व्यक्तीवर किती प्रेम करत आहेत! तर मग, पिताश्रींच्या प्रेमाचे मोती ग्रहण करणारा हंस का बनू नये? बाबांच्या निःस्वार्थ प्रेमामुळे सारे संशय संपले, हृदयातला दूरावा दूर झाला व ते कायमचे बाबांचे दिवाणे झाले. तेव्हापासून रमेश भाई व उषा बहन पक्के योगी बनून, ब्रह्माकुमारीजचे सच्चे सेवाधारी व सक्रीय कार्यकर्ता बनले.

खरं तर ब्रह्माबाबाच रमेशजींच्या जीवन परिवर्तनाचे आधार होते! बाबा नेहमी मुंबईत जात, तेव्हा बागेत फेरफटका मारताना भाईंना सेवेचे विविध विधी शिकवत अन् आदर्श शिक्षक बनून ज्ञानाच्या अस्त्र-शस्त्राने त्यांना सुसज्जित करत. एकदा चार पृष्ठांचं फोल्डर छापलं, त्याला नानाप्रकारे समजावण्याच्या वेगवेगळ्या पद्धती सांगितल्या. असंच भारतात आलेल्या अमेरिकन संन्याशाला दुपारी भेटायचं होतं. त्यांना ज्ञान कसं द्यायला हवं? हे सांगता-सांगता बाबा एवढे तल्लीन झाले की बाबा अनवाणी पायानेच रमेश भाईंना सोडण्यासाठी लिफ्ट पर्यंत आले. सेवा करून परत आल्यावर बाबा पूर्ण समाचार ऐकत. भ्राताजी बाबांना एकदा कारमधून पुण्याला घेऊन गेले, परत येताना जिथे नास्ता केला होता, त्या जागेची आठवण करुन दिल्यावर बाबा म्हणाले, 'मुला, ज्यात कमाई आहे त्याचीच आठवण कर. बाकी सर्व गोष्टी फालतू आहेत.' असे रमेश भाई अनन्य, पदमापदम सौभाग्यशाली ब्रह्मावत्स होते. ज्यांना बाबा-मम्मांचे संगोपन व दीदी-दादींचं सानिध्य लाभलं. अनेकदा मम्मा-बाबा त्यांच्या घरी राहिले. यज्ञाच्या गोपनीय इतिहासाचे भाईजी जवळचे साक्षीदार बनले.

कानपुर येथे हॉस्पिटलमध्ये मम्मांची तपासणी केल्यावर एक गाठ आढळली. रमेश भाई बाबांना म्हणाले, 'बाबा, मातेश्वरीजींना कानपुरहून सरळ मुंबईत पाठवा.' बाबा म्हणाले, 'मम्माला कुठे ठेवू?' भाईजी म्हणाले, 'आमच्या घरी.' बाबा म्हणाले, 'तुमचं जुनं घर तर आता नाहीये.' तेव्हा भाई म्हणाले, 'आई आजारी असली तर आपण तिला घरात ठेवत नाही का? माझी बहीण अनिला डॉक्टर आहे, ती देखरेख करेल.' हे सांगून भाईंनी बाबाचं ओझं हल्कं केलं व मम्मांना स्वतःच्या घरात ठेवून उपचार केला. मम्मांना कॅन्सर झाला होता. कॅन्सरची अंतिम स्टेज झाल्यावर डॉक्टर म्हणाले, 'मातेश्वरी काहीच दिवसाच्या पाहुण्या आहेत.' तेव्हा शीलइन्द्रा दादींना रमेश भाई म्हणाले, 'दादीजी ध्यानावस्थेत जा व मला भेटायला बाबांना पाठवा.' दादींनी स्पष्ट नकार दिला व म्हणाल्या, 'ब्रह्माबाबांना सांग, बाबा म्हणाले तर मी जाईन.' भाईजी म्हणाले, 'शिवबाबांशी अतिशय महत्त्वाचं बोलायचं आहे, तुम्ही बाबांना माझी विनंती कळवा, बाबांची मर्जी असेल तर तुमच्या देहात स्वतः येतील.' दादी ध्यानावस्थेत गेल्या, त्यांच्या तनाद्वारे शिवपित्याशी भेट झाली, बोलणी झाली.

अन् रमेश भाई अधिकाराने म्हणाले, 'बाबा, आपणच सुप्रीम सर्जन आहात, तुम्हीच मम्मांचा इलाज करा.' दोन ते अडीच तास बापदादांशी भाईंचा संवाद झाला. अखेर बाबा म्हणाले, 'मुला, विश्वनाटकाला हेच मान्य आहे.' हे ऐकून भाईंच्या नेत्रांवाटे गंगा जमूना वाहू लागली, तेव्हा बाबांनी भाईंच्या हातरुमालाने त्यांचेच डोळे पुसले, जेणेकरुन शीलइन्द्रा दादींनाही झालेला गुप्त संवाद कळू नये. भाईंनी हा समाचार ब्रह्माबाबांना दिला. बाबा म्हणाले, 'मम्माचा संदेश मम्मालाच दे.' भाईंनी मातेश्वरींना चिठ्ठीत लिहून दिलं, ती वाचून मम्मा म्हणाल्या, 'ईश्वरेच्छा बलियसी! अंतिम वेळ माहीत झाल्यावर ही अशी होती मम्मांची कमालीची अद्भुत अचल-अडोल स्थिती!

आबू येथील पाण्डव भवन विश्वकिशोर दादांच्या नावे खरेदी केलं होतं. दादांची इच्छा होती ते व्यक्तिच्या नावाऐवजी संस्थेच्या नावावर हवं. म्हणून दादांनी पाण्डव भवन संस्थेच्या नावे करण्यासाठी मुंबईच्या नामवंत वकिलांद्वारे कागदपत्रं बनविली, पण ब्रह्माबाबांनी ती नाकारली. दादांचे प्रोस्ट्रेट ग्लॅण्डचे ऑपरेशन निश्चित झालं, तेव्हा सर्व बाबी फाईनल करुन रमेशजींद्वारे कागदपत्रं बनवून, बाबांची स्वीकृती घ्यायला दादा व भाई आबूला निघाले. दादा भाईंना म्हणाले, 'हे बाबांना दाखवू, ते हो म्हणाल्यावर माझ्या नावाचं पाण्डव भवन संस्थेच्या नावे करू.' दोघे स्टेशनवर उतरले. भोलीदादी बाबांची चिठ्ठी घेऊन उभ्या होत्या. बाबांनी लिहिलं होत, स्टेशनवरच स्नान करा अन् कागदपत्रं रजिस्टर्ड करूनच आबूत या. स्टेशनवर अंघोळ करून दादांनी स्टॅंप पेपर घेतले. स्टॅंप वेण्डरने एक तासानंतर बोलवलं. तेथूनच दादांनी बाबांना फोनवर विचारले, 'कागदपत्रे दाखवू का? बाबांनी रजिस्टर्ड करूनच वर (आबू) यायला सांगितलं. आबूरोडच्या रजिस्ट्रार ऑफिसमधे रजिस्टर्ड करून दोघें आबूत आले. संध्याकाळी बाबांना भेटल्यावर दादांनी विचारलं, 'बाबा, नामवंत वकिलांनी बनवलेल्या कागदपत्रांऐवजी रमेशजींची कागदपत्रेच का स्वीकारली?' बाबा म्हणाले, 'मी त्रिकालदर्शी आहे, तू नव्हे! रमेशला विचार कागदपत्रं कुणी लिहिली? मीच त्याच्या द्वारे कागदपत्रे बनवली, म्हणून मला दुसऱ्यांदा वाचायची काय गरज?' त्यानंतर देश-विदेशात अनेक प्रकारच्या संपत्ती, यज्ञाच्या नावे किंवा ट्रस्टच्या नावावर खरेदी करायचे व कागदापत्रं बनवायचे सौभाग्य रमेश भाईंना लाभलं.

रमेश भाई ईश्वरी खजिन्याचे अनमोल रत्न होते. त्यांनी गीत, नाटक, लघुचित्रपट, प्रदर्शनी इत्यादींच्या माध्यमातून ईश्वरी सेवेला विराट रूप दिले. चित्र प्रदर्शनी, प्रोजेक्टर शो द्वारे जनसामान्यापर्यंत परमात्म्याचा संदेश पोहचवला. बाबा फिल्मी गीतांवर ज्ञानमुरली चालवत, तेव्हा भाईजी बाबांना म्हणत, 'बाबा ही गीतं ऐकून आम्हाला फिल्मी दृश्यं आठवू लागतात. त्याने आमचा योग तुटतो. म्हणून आपल्या ज्ञानाचे गीत हवे'. भाईजींनी 'वसुधा के आचल में, शिव स्वागत तुम्हारा' हे पहिलं गीत रेकॉर्ड करवलं. साप्ताहिक चित्र प्रदर्शनी बनविण्यात भाईजी अग्रणी बनले व प्रथम आध्यात्मिक चित्र प्रदर्शनीचं १९६४ मधे महाराष्ट्राचे तत्कालिन राज्यपाल श्री मंगलदास यांच्याद्वारे उद्घाटनही करविलं. भाईजी १९६८ मधे विद्यालयाद्वारे स्थापन झालेल्या विश्व नवनिर्माण ट्रस्टचे मैनेजिंग ट्रस्टीही बनले. ते ब्रह्माकुमारीज शिक्षण सोसायटीचे फाऊण्डर सेक्रेटरी, राजयोग एज्युकेशन अँड रिसर्च फाऊण्डेशनचे ऑर्गनाईजिंग सेक्रेटरी, न्याय प्रभागाचे अध्यक्ष व स्पार्क विंगचे मुख्य संचालक होते. १९७१ मधे विद्यालयाद्वारे परदेशात सेवेसाठी गेलेल्या पहिल्या ग्रुपचे धुरीण बनून त्यांनी विदेश सेवेचा श्रीगणेशा केला. भाईजी न्याय विषयात जसे पारंगत होते तसे गीत व नृत्यनाटिकेचे उत्कृष्ट लेखक होते. भाईंनी विश्व इतिहासाचा गाढा अभ्यास करून 'पुरुषोत्तम संगमयुग' व संपत्तीच्या सदुपयोगाची व्याख्या करून 'पवित्र धन' ही दोन अमूल्य पुस्तकं लिहिली.

गॉडलीवूड स्टूडिओ प्रमुख ब्र.कु. हरिलाल भाई, भ्राता रमेशजींच्या सानिध्यात राहून त्यांच्याद्वारे प्राप्त झालेल्या अपार प्रेमाचे वर्णन असं करतात, 'रमेश भाईंशी माझा १९६५ मधे संपर्क झाला, त्यांनीच मातेश्वरीशी माझी भेट घालून दिली. मी त्यांच्यासारखा भाग्यवान पाहिला नाही, त्यांच्या कर्मात व कार्यात त्यांचं भाग्य स्वतः प्रकट झालं. त्यांना भविष्य स्पष्ट होतं. लोक प्रॉपर्टीसाठी वंशवृद्धी करतात, परंतु भाईजी म्हणत आम्ही आहोतच समर्पित! बाबाच आमचे वारस आहेत आणि म्हणून ते मृत्यूपूर्वी सर्व इस्टेट मृत्यूपत्राद्वारे संस्थेच्या नावावर करुन गेले. त्यांचे मृत्यूपत्र सहजपणे मार्गी लागले. ते कित्येकांची मृत्यूपत्रेही

देऊन गेले. त्यांच्या इच्छेप्रमाणे घर, ऑफिस, सर्व वस्तू आणि एक न एक पैसा सफल झाला. अगदी कफलिंक, टाय, टाईपिन ह्या वस्तूही स्टूडिओत उपयोगात आल्या. त्यांनी कधीही कुणाचा गैरफायदा घेतला नाही. आम्ही सोबतच मधुबनला यायचो-जायचो, पण प्रवासाचे भाडेही त्यांनी यज्ञाकडून कधी घेतले नाही. ते जेवढे शिस्तप्रिय होते, तेवढेच उदार सहृदय होते. संवेदनशील बनून सर्वांशी संबंध कसे जपावे?- हे तर कुणी त्यांच्या द्वारेच शिकावे! भाईंशी माझा घरगुती संबंध होता, ते मला नेहमी मोठ्या भावाचं प्रेम देत. उषा बहनच्या देहत्यागानंतर प्रत्येक बुधवारी ते ऑफिसहून सरळ घरी बोलवायचे. खूप रुचीने आवडणारं भोजन बनवत. आम्ही कच्छी लोक ताक अवश्य पितो, म्हणून ते ताक आवर्जून बनवत. कुटुंबाची ख्याली खुशाली विचारत. प्रत्येक गोष्टीची चर्चा करत. घरंच्यासाठी मुखवास (गुजराती पदार्थ) बनवून सोबत देत. अशा प्रकारे मी रात्री ११ वाजेपर्यंत त्यांच्या सोबत आनंदाने राही. एखाद्याला आपलं बनवण्याची त्यांची लकब काही औरच होती! त्यांनी मला समर्पित केलं अन् जाता-जाता ते गॉडलीवूड स्टुडिओचं उत्तरदायित्व मला सोपवून गेले.

रमेश भाईंचे सेवासाथी निर्मल भाई, भाईजीची वैशिष्ट्ये व त्यांच्या अंतिम स्थितीचं वर्णन असं करतात, 'भ्राताजी पक्के यज्ञरक्षक होते. ते यज्ञाचं अहित पाहू शकत नसत. कुणी नुकसान केलं तर शिस्तप्रिय बनत. ते शिस्तप्रिय असले तरी मात्र त्यांचं हृदय खूप कोमल होतं. एखाद्या नाटकात दुःखद प्रसंग पाहिल्यावर भावनाप्रधान भाईजीचे डोळे भरुन येत. त्यांना सत्य खूप प्रिय होतं, ते पाठीमागे कुणाचीही निंदा करत नसत. जे काही सांगायचं, ते स्पष्टवादी बनून, समोरासमोर बोलवून सांगत. ते मोफत कोणतीही वस्तू व गिफ्ट्स कधीच घेत नसत. यज्ञातून औषध जरी घेतलं तरी दानपेटीत पैसे टाकत. ते नेहमी म्हणत, 'मी देऊ शकत नाही, तर घेऊही शकत नाही.' ब्रह्माकुमारीज द्वारे संचालित मुंबई बी.एच.एस हॉस्पिटल मधे त्यांचे भाऊ मधु यांनी उपचार घेतला; पण योगिनी दीदींनी बिल घेतलं नाही- हे जेव्हा त्यांना माहीत झालं, तेव्हा त्यांनी बिल भरायला लावलं. जर सेंटरवर भोजन किंवा प्रसाद घेतला तर भण्डारीत पैसेही टाकत. ते एकॉनामीचे अवतार होते. जीरो व्हॅटचा बल्बही चालू असला, तरी सावधान करत. त्यांच्या बारीक नजरेपुढे कुणीही चूक लपवू शकत नसे. एका बहिणीची फाईल बघताच त्यांनी नाव विचारलं तर बहीण म्हणाली, 'वनिता!' आणि लिहिलं होतं 'विनता!' हॉस्पिटलमधे असताना अंतिम समयी असह्य व्याधी असूनही त्यांचा वेदनांचा स्वर (आवाज) ऐकला नाही, ना त्यांच्या चेहऱ्यावर कधी दुःखाचे चिन्ह दिसले नाही. त्यांची एकदम उपराम स्थिती व अशरीरी अवस्था होती. ब्रह्माबाबांशी अंतःकरणापासून प्रेम होतं आणि म्हणूनच भाईंनी जणूकाही देहत्यागासाठी अव्यक्त मास (जानेवारी महिना) निवडला व २८ जानेवारी २०१७ रोजी नश्वर देहाचा त्याग करून भाई सूक्ष्मवतन मधे अव्यक्त बापदादांच्या कुशीत सामावले.

***

सय बाबांची

आठवण येता बाबा डोळे माझे भरले
कंठ दाटला माझा शब्द ओठीच थांबले
तुला शोधण्या बाबा सारे जग फिरले
तूच माझ्या आसपास मला नच कळले

मी तुझी गोपी तू गोपी वल्लभ माझा
कंठ दाटला माझा शब्द ओठीच थांबले
मी भाग्यवान तू मिळता संगमी
स्वर्गाचे सारे सुख आले माझ्या अंगणी

जोडली नाती सगळी, सर्वस्व तुझे झाले
कंठ दाटला माझा शब्द ओठीच थांबले
माझी सारी पुण्याई आज फळा आली
बाबाच्या संग मी अंतरबाह्य उजळले

तूच माझा माता पिता सद्गुरु माउली
कंठ दाटला माझा शब्द ओठीच थांबले

ब्र.कु.लता, देगलूर

अलौकिक आकाशवाणी केंद्र आणि मी

ब्र.कु. रमेश, रेडिओ मधुबन, आबू रोड

ओम्-शांती. माझे नाव ब्र.कु. रमेश भाई, ठाणे जिल्ह्यातील बदलापूर हे माझे लौकिक गाव. परंतु सध्या मी मा. आबू येथील शांतीवन येथे समर्पित जीवन जगत आहे.

मागील २० वर्षांपासून मी ह्या ज्ञानमार्गात असलो, तरी १२ वर्षांपासून संपूर्ण समर्पित रूपात रेडिओ मधुबन ह्या विभागात रेडिओ जॉकी म्हणजेच रेडिओ वर वेगवेगळे कार्यक्रम प्रसारीत करण्याची (जबाबदारी) सेवा पार पाडत आहे. मी बाबांचे ज्ञान कसे घेतले किंवा मला ते कसे मिळाले हे आज मी तुम्हाला सांगणार आहे. तसे पाहिले तर बाबांच्या प्रत्येक मुलाची बाबांना संगमयुगात भेटण्याची कहाणी मोठी आगळी वेगळी असतेच.

माझी दहावी झाल्यानंतर वडील मला म्हणाले, रमेश तू ही सुट्टी वाया घालवू नकोस. ह्याचा सदुपयोग कर. काही तरी काम कर. त्यामुळे तुला काही नवीन शिकावयास मिळेलच परंतु चार पैसे कसे कमवावेत तेही कळेल. पैशाचं महत्त्व कळेल तुला, तेव्हा माझी इच्छा आहे की, तू काही कामधंदा करावास. मी होकार दर्शवला.

मग बाबांनी कुठेतरी ओळख काढून मला एमआयडीसीमध्ये कामासाठी पाठवले. फावला वेळ बराच असल्याने मीही लगेच कामावर रुजू झालो. तिकडे निरीक्षकाचे काम मिळाले. त्याचबरोबर कुणी कामावर गैरहजर असल्यास त्याच्या जागी काम करावे लागे. तिथे रसायनांच्या विभागात माझे काम होते. एकदा काम करता करता ते रसायन माझ्या अंगावर पडल्याने मला थोडे भाजले. घरी आल्यावर वडील हे बघून फार घाबरले आणि माझे तिकडे जाणे त्यांनी बंद केले.

त्यानंतर २-४ दिवस गेले. एक दिवस आमच्या घरी बाबांचे मित्र आले होते. त्यांनी माझी आस्थेने चौकशी केली. बाबांना म्हणाले, तुमच्या मुलाला सध्या सुट्टी आहे, तर त्याला माझ्या मित्राच्या औषधांच्या दुकानात का नाही पाठवत? त्यालाही मदत होईल आणि हा काही शिकेल. तिथे औषधांची नावे, उपयोग ह्याला समजेल, पुढे त्याला याचा उपयोगच होईल. मी हो म्हटले. दुसऱ्या दिवशी वडील मला अंबरनाथ रेल्वे स्टेशनच्या बाहेर असलेल्या त्या मेडिकल शॉपमध्ये घेऊन गेले. मी कामाला लागलो. मी कामाला लागून काही दिवस उलटले. एक दिवस एक भाऊ आला औषधं घ्यायला. औषधे बॅगेत घालून मी त्याला दिली, बिल पण दिले. पैसे देताना मला त्याच्या हातात एक की-चेन (Key-chain) दिसली त्यावर शिवबाबांचे किरणांचे चित्र होते. त्याने दिलेले पैसे घेतले, पण त्याचबरोबर ती की-चेन ही पकडली. म्हटलं हे मला द्या न मला हवंय. तो भाऊ हसला, पण त्याने ती की-चेन मला दिली नाही. मीही अडून बसलो प्लीज मला द्या ना ही ! अशी माझी अवस्था होती. शेवटी तो की-चेन खेचून चालू लागला. मीही दुकानातून बाहेर आलो. पुन्हा विनवले मला द्या ना हे - तो शेवटी म्हणाला 'अरे तू काय करणारेस ह्याचं ही साधी गोष्ट नाहीये. मी तुला देऊ शकत नाही. तुला हवी असेल तर तू ब्रह्माकुमारी सेंटरवर ये. तिथे ह्या गोष्टी मिळतात. मला कुठल्याही परिस्थितीत ते हवंच होतं. ते बाबांच चित्र खूपच आकर्षित करत होते मला. म्हटलं मला पत्ता द्या मी नक्की येईन. त्यांनी मग मला एक कार्ड दिले. मी घेतले आणि बॅगेत ठेवले. पण नंतर कामाच्या गडबडीत विसरलो तिकडे जायला.

काही महिन्यांनी आम्ही अंबरनाथहून बदलापूरला बदली होऊन आलो. इथेही मी औषधांच्याच दुकानात काम करायला लागलो, इथेही अगदी तस्सेच झाले, जसे अंबरनाथच्या दुकानात. अगदी तस्साच बाबांचं चित्र असलेला बॅच एका माणसाच्या शर्टावर दिसला. तो

आमच्या शेजारच्या दुकानात गेला. पुन्हा मी खेचला गेलो बाबांच्या त्या चित्राकडे ! मी त्या माणसाच्या मागे मागे गेलो. त्याला कळलं ह्याला काहीतरी बोलायचंय पण जरा घाबरतोय तसा तोच म्हणाला 'ओम्-शांती'. मी म्हटलं 'तुम्ही कोणत्या सत्संगात जाता का?' तो म्हणाला, 'हो मी ब्रह्माकुमारीजमध्ये जातो.' इथे जवळच एक छोटी गीता पाठशाळा आहे. पण मी दर गुरुवार - रविवार मात्र मुख्य सेवाकेंद्रावर अंबरनाथला जातो. तुम्हालाही यायचे आहे का? 'मी म्हटलं' 'अहो मला फक्त हा बिल्ला हवा आहे.' तो हसला म्हणाला, 'हा बॅज तर तुम्हाला सेवाकेंद्रातच मिळू शकेल. तुम्ही असे करा ह्या पत्त्यावर जा' असं म्हणून एक कार्ड दिले ते तेच होते. तेव्हाच मी ठरवून टाकलं की आता तर मी नक्कीच जाणार इथे.'

२-३ दिवसांनी ती व्यक्ती परत आली मी गेलो की नाही हे बघायला, त्याने विचारल्यावर मी नाही असे सांगितले. मग तो म्हणाला 'एक भाऊ आहे, तो दर गुरुवारी जातो. तो तुम्हाला बरोबरच घेऊन जाईल. तुम्ही फक्त अंबरनाथ स्टेशनला भेटा त्याला. 'असे म्हणून त्यांनी मला अजून काही माहिती दिली संस्थेबद्दल. मी ह्यावेळी मात्र अगदी आठवणीने जाणारच असे ठरवून स्टेशनला गेलो. पण ज्या व्यक्तीला सांगितले ती वेळेवर आलीच नाही. मी बराच वेळ वाट बघितली. शेवटी जे कार्ड होते, ते घेऊन एकटाच गेलो सेंटरवर.

ती बिल्डींग ओळखणे फारसे कठीण नव्हते. पांढऱ्या रंगाची ती इमारत, त्यावर शिवबाबांचा झेंडा. त्या दिवशी बहुतेक गुरुवार होता. संध्याकाळचे ७-७.३० वाजले होते. खूप लोकं बसली होती त्या हॉलमध्ये. मी आत पोहोचेपर्यंत ८ वाजले होते. सर्वांनी प्रसाद घेतला आणि निघून गेले. मी नवीन असल्याने कुणाला बरे भेटावे या विवंचनेत होतो. तेवढ्यात एक बहीण (दीदी) आल्या मला विचारले 'पहिल्यांदाच आलात का आपण ?' मी हो म्हणताच बाजूच्या खोलीत बसवले. कुणी पाठवले विचारल्यावर मी त्या भावाचे नाव सांगितले. त्यांनी कोर्स करा म्हटले पण कोर्स काय असतो काहीच कळले नाही, तरी मी करीन असं सांगितले. त्या म्हणाल्या 'या मग उद्यापासून ह्याच वेळेला.' मी निघालो. मलाही गुरुवारचा तो प्रसाद दिला गेला.

दुसऱ्या दिवशीपासून माझा साप्ताहिक कोर्स सुरू झाला. अशाप्रकारे मी ब्रह्माकुमारीजशी जोडला गेलो.

तुम्हाला सांगायला आवडेल मला - की खूप आधीपासून मला काही काही जाणवायचं - म्हणजे उदाहरणार्थ मी सायकलवरून कामाला जातोय पण जाणवतंय की' मी बेफिक्र बादशाह आहे' म्हणजे काय कळायचं नाही, पण हे शब्द आठवायचे. कधी कधी वाटायचं मी ह्या शरीरापेक्षा वेगळा आहे. शरीर वेगळे मी वेगळा - पण मी कोण? ह्या सर्वांचा उलगडा मला होत गेला जसा जसा मी कोर्स करत गेलो तसेतसे मधुबन सेवेसाठी ही जायला सुरुवात केली. मी मुंबई सांताक्रुझ येथून रेडिओ जॉकीचा कोर्स केला होता. इथे रेडिओ मधुबनला (ब्रह्माकुमारी) रेडिओचे लायसन्स मिळाले तसा मी रेडिओसाठी सेवा करायला लागलो. मग रेडिओसाठी बाबांचे दिवस जसे १८ जानेवारी मम्मा डे, सण, होळी, दिवाळी ह्यांसारखे कार्यक्रम करायला सुरुवात केली. अशाप्रकारे माझी रेडिओ स्टेशनवरची सेवा पक्की झाली.

आता ज्ञानात आल्यानंतरचा सेवेचा अनुभव सांगतो. मुलुंड पासून उल्हासनगर पर्यंत एक मेटॅडोर यात्रा निघाली होती (साल २००३) त्यामध्ये मी एकपात्री प्रयोग करायचो सेवार्थ - व्यसनमुक्तीचा. त्यानंतर मधुबन शांतीवन येथून गुजरात - मुंबईपर्यंत My India, Healthy India rally मध्येही एकपात्री नाटक मी केले (साल २००८) अशाप्रकारे अंबरनाथ ते कर्जत यात्रा काढली होती, त्यात मी व्यसनमुक्तीचे एकपात्री नाटक केले होते. ह्या सर्व यात्रांमध्ये मी ३०० हून ही जास्त वेळा हे नाटक प्रयोग केले. कारण गावागावातून व्यसनमुक्ती अभियानादरम्यान ते सुरू करण्यापूर्वी असे एखादे नाटक करतातच जेणेकरून लोकांनी गर्दी करावी, एकत्रित व्हावे. त्यामुळे ह्या यात्रेचे हे नाटक आणि पर्यायाने मी एक अविभाज्य भाग झालो. तसेच मोठ्या रंगमंचावरही हे एकपात्री नाटक मी केले. अशाप्रकारे ३०० प्रयोग झाल्यावर त्याची नोंद आम्ही India Book of record साठी पाठवली आणि मग ह्या IBR वाल्यांनी मला One man show ह्या किताबाने गौरविले.

करोना काळात बाहेर जाऊन सेवा करणे शक्य नव्हते. मग मी online सेवेवर भर दिला. ह्या काळात मी लोकांना गाण्याच्या कार्यक्रमासाठी प्रोत्साहित केले. ह्या रेडिओ ऑनलाईनमध्ये खूप लोकं एकत्र आली. त्याचे आजपर्यंत जवळ जवळ १००० कार्यक्रम झाले. ते बघून India book of record नी मला प्रशस्तिपत्रक दिले. त्यामागचे कारण

म्हणजे तुम्ही करोना काळात लोकांना व्यग्र ठेवले. कलेच्या माध्यमातून सकारात्मकता शिकवली.

त्यानंतर बदलापूर येथील एका संस्थेकडून 'स्वामी विवेकानंद सन्मान' सुद्धा मला मिळाला. त्यांनी समाजसेवेनिमित्त तसेच ब्रह्माकुमारीजच्या माध्यमातून जी सेवा करतोय त्यासाठी सन्मानीत केले. असे बरेच गौरव वेगवेगळ्या कार्यासाठी मला मिळालेत. मी खूप पूर्वीपासून कविता करतो, तो छंद आहे माझा पण ज्ञानात आल्यानंतर काही काळ ह्याकडे दुर्लक्ष झाले. एकदा एका सेंटरच्या दीदी मला भेटल्या. बोलता बोलता त्यांना मी केलेली एक कविता ऐकवली, त्यांना ती फार आवडली. त्या लगेच मला म्हणाल्या तुम्ही अशाच छान छान ५१ कवितांचा संच करा. आधीच्याही कविता काढा, त्यांच्या सगळ्या मिळून ५१ कविता लिहा. भले एक दोन वर्षे जाऊ देत. मला वाटते ही बाबांचीच प्रेरणा असावी. त्यांच्याद्वारे बाबांनीही ही सेवा माझ्याकडून करून घेतली. मग काय मी वर्षभरातच अगदी ५१ कविता लिहून दीदींना पाठवून दिल्या. दीदींनी 'अर्पण' ह्या नावाने त्याचे पुस्तक बनवून मला चकितच केले जणू ! बाबांनी अशाप्रकारे हे कवितांचे पुस्तक माझ्याकडून लिहून घेतले. तसेच आता दुसरेही पुस्तक लिहिणे चालू आहे, त्याचे नाव 'दर्पण' ठेवले आहे.

तुमच्यातही काही कला गुण असतील, तर ते तुम्ही या रेडिओ online programme च्या माध्यमातून सादर करू शकता त्याचबरोबर बाबांच्या ह्या रेडिओ स्टेशनवर होणाऱ्या सेवेतही आपण सहभागी होऊ शकता. याविषयीची माहिती ब्र.कु. सेवाकेंद्राद्वारे मिळवा ही विनंती.

***

(पृष्ठ क्र.३ वरून)

मंडळींना अनुभवावे लागले. पण 'जाको राखे साई' म्हणतात तसे सत्याच्या व पवित्रतेच्या शक्तीसमोर वैषयिक भावना निष्प्रभ ठरल्या. अनेक भगिनींवर आलेली बंधने गळून पडली. या धामधुमीचे वर्णन तत्कालीन 'सिंध ऑब्झर्व्हर' नावाच्या वृत्तपत्रातही झळकून गेले होते.

हळूहळू या ईश्वरी ज्ञानाचा प्रसार सिंध कराची व सिंध हैदराबादमध्ये पसरला होता. ओम मंडळीचे नाव सर्व तो मुखी झाले होते. या पार्श्वभूमीवर १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व १९५० मध्ये ओममंडळी भारतात आली.

अरावली पर्वत शृंखलेतील आबू या स्थानी 'ओम मंडळी' येऊन स्थिरावली. एकीकडे राजयोगाचा सखोल अभ्यास तर त्या जोडीला परमात्मा शिवाद्वारे प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची गोडी असा हा अलौकिक अभ्यासक्रम सर्वांचा सुरू झाला. ब्रह्माबाबा एक सेवक, एक पिता म्हणून सर्वांत वावरत असत. विश्वस्त मंडळातील ८ भगिनी मिळून या सत्संगाचा कार्यभार सांभाळीत असत. या सत्संगाला अलौकिक अशा यज्ञाचं स्वरुप प्राप्त झालं. कुठल्याही जाती-धर्माच्या, पंथाच्या माणसाने यावं आणि आपल्या विकारांची या ज्ञानयज्ञात आहुती द्यावी. त्यासाठी स्त्री-पुरुष, लहान-थोर असं कुठलंही बंधन नव्हतं. सगळं आध्यात्मिक शिक्षण नि:शुल्क! जणु काही सगळे ब्रह्मावत्स एकाच कुटुंबाचा हिस्सा बनत गेले. ज्यांच्या जीवनात पवित्रता, शुद्धी व वागण्या बोलण्यात निर्मळपणा येत गेला ते जणु खरेखुरे ब्राह्मण्याचे पालन करू लागले.

या ज्ञानयज्ञातील सर्व प्रकारची कामें/सेवा करीत असताना ब्रह्मा बाबांनी आपली व्यक्तिगत साधना कधीही ढिली पडू दिली नाही. वृद्धत्व, शारीरिक व्याधी यासारख्या कुठल्याही मर्यादा त्यांच्या साधनेचा वेग कमी करू शकत नव्हत्या. वयाच्या ९३व्या वर्षापर्यंत निराधार आसन घालून ब्राह्ममुहूर्तावर उठून साधना करत. एकही दिवस त्यांनी साधना चुकवली नाही. त्यांच्या साधनेचे प्रभामंडळ इतके शक्तीशाली बनत गेले की, शेवटच्या काही कालावधीत अनेकांना त्यांच्या सान्निध्यात अध्यात्मातील सखोल अनुभव सहज होत गेले. त्यांच्या दृष्टीद्वारे अनेक जण तत्काळ स्वत:ला ज्योतिर्बिन्दू आत्मा अनुभव करू लागले. अशा प्रकारे साधनेची सर्वोच्च स्थिती गाठल्यावर १८ जाने. १९६९ रोजी त्यांनी आपला नश्वर देह त्यागून ईश्वराशी कायमचे सान्निध्य साधले.

***

आरोग्य रहस्य
झोप आणि पचन

वैद्य सुविनय दामले, कुडाळ

झोप पूर्ण होण्यावर देखील, अन्नपचन अवलंबून असते ब्राह्ममुहुर्तेउत्तिष्ठेत् जीर्णाजीर्ण निरूपयन । असे दिनचर्येतील पहिलेच सूत्र आहे.

याचा अर्थ असा आहे की, पहाटे उठावे, काल घेतलेले अन्न, पचले की नाही, हे ठरवावे... म्हणजे अंथरूणातून बाहेर पडल्या पडल्या, दोन नंबरचा कॉल आलाच पाहिजे. (आणि पाच मिनिटात परत बाहेर देखील आले पाहिजे) म्हणजे कालचे अन्न व्यवस्थित पचले आहे असे समजावे.

पुढचा भाग महत्त्वाचा आहे. जर अन्न पचले नसेल, तर परत झोपावे. असे पुढील भाष्यकार म्हणतात.

(अन्नपचन पूर्ण होण्यासाठी किमान बारा तास लागतात असे गृहीत धरले आहे. स्वमत)

याचा दुसरा अर्थ असा आहे की, अन्न पचन पूर्ण व्हायला पुरेशी झोप अत्यंत आवश्यक आहे. म्हणून तर झोपेला, आहार आणि ब्रह्मचर्याबरोबरीने तीन स्तंभामधे स्थान दिले आहे. एवढे या झोपेचे महत्त्व आहे. ज्याची झोप चांगली त्याचे पचन चांगले.

अगदी तान्ही बाळे जास्ती झोपतात. जी बाळे जास्ती झोपतात, ती बाळसेदार होतात आणि जसजसे वय वाढू लागते. तसतशी झोप कमी होत जाते आणि बाळसे उतरू लागते. (काही सन्माननीय अपवाद असतात हं. ज्यांचे वय वाढले तरी झोप कमी होत नाही आणि बाळसे पण कमी होत नाही.)

वृद्धावस्थेत, चुकलं, ज्येष्ठ नागरिकांची झोप आणखीनच कमी होते आणि बाळसेदेखील... कारण वय बदलले, काळ बदलला, अवस्था बदलली, दोष बदलले, झोप बदलली, पचनही बदलले.

म्हणजेच अन्नपचन पूर्ण होण्यासाठी पुरेशी झोप अत्यंत आवश्यक आहे.

ज्यांची जागरण करण्याची ड्यूटी असते, ज्यांना दिवसाची पण पुरेशी झोप घेता येत नाही, त्यांचे पचन हमखास बदललेले असते. बिघडलेले असते. अशी माणसे सतत चिंतेत असतात. जिवंतपणी जळतात. बारीकच राहतात.

परिणाम ? वारंवार वातप्रकोप... मलावष्टंभ... कोष्ठविकृती.. व्याधी !

उपाय ? रात्रीच्या जागरण कालावधीच्या निम्मा वेळ दिवसा शांत झोप घेणे.

बस्स !! बाकीचं निम्मं पचवायला सूर्य असतो ना.

आणि दुसरे काय, ज्यांना कसलीच चिंता नाही, आणि ज्यांना टीव्ही पाहण्यासाठी, WA/FB साठी जागरण करावे लागते... ते सकाळी उशिरानेच उठतात, पण रात्रीची झोप दिवसा पूर्णपणे पूर्ण करतात. आणि पचन पूर्ण करून घेतात. भूकही सपाटून लागते आणि छान 'बाळसेदार' होतात. हौस. दुसरं काय ?

***

विशेष निवेदन – वाचक सभासद व टीचर बहिणींकरिता

वर्षभरात कुठल्याही महिन्यापासून आपण सदस्य होऊ शकता. वार्षिक वर्गणी मात्र रु.८५/– आणि आजीव सदस्य केवळ रु.१५००/– आहे. वर्गणी भरली नसेल तर लवकरात लवकर भरावी ही विनंती!

निर्मल आश्रम

ब्र.कु. प्रणिता, पर्थ, ऑस्ट्रेलिया

ब्र.कु. निर्मला दीदींनी २० ऑक्टोबर २०२३ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी देह त्यागला. ब्रह्माकुमारी संस्थेच्या परदेशातील कार्यविस्तारात त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.

ब्र.कु. डॉ. निर्मला दीदी यांचा जन्म १९३५ मध्ये मुंबईतील एका उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात गुजराती कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांनी ग्लॅमरस फिल्म इंडस्ट्रीमध्ये चित्रपट वितरक म्हणून यश मिळवले; पण तरुण निर्मलाला मात्र गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी वैद्यकीय प्रशिक्षण घ्यावेसे वाटत होते. मुंबईत वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यावर, १९६२ मध्ये, वयाच्या २७ व्या वर्षी डॉ. निर्मला यांना ब्रह्माकुमारी संस्थेची माहिती मिळाली. त्याच सुमारास त्या आपले वैद्यकीय कौशल्य गरीब गावकऱ्यांपर्यंत नेण्याचा विचार करत होत्या. मुंबईत राहून आणि शहरी समाजात सेवा करून वैद्यकीय आणि आध्यात्मिक असे दोन्ही फायदे मिळू शकतात, असे त्यांच्या लक्षात आले. डॉक्टर निर्मला यांनी मुंबईत बीके सेंटर सुरू केले आणि वैद्यकीय प्रॅक्टिसही सुरू ठेवली.

ध्यानाच्या व्यावहारिक फायद्यांची खात्री पटल्यावर डॉ. निर्मला यांनी रूग्णांवर उपचार करताना राजयोगाचा प्रयोग केला. १९६५ मध्ये, त्यांनी विकसनशील देशांमध्ये सामान्य असलेल्या आजारांसाठी आगळे-वेगळे एक वैद्यकीय क्लिनिक स्थापित केले. जेव्हा त्यांच्या उपचारांना मेडिटेशनची जोड दिली तेव्हा रूग्णांनी अधिक चांगला प्रतिसाद दिला. ''माझ्या वैद्यकीय अभ्यासाचे उद्दिष्ट लोकांना मदत करणे होते. मला असे दिसून आले की औषधाने, मी हाती असलेले उपचार केले की थोड्या काळासाठीच आजार जातो आणि तोच त्रास घेऊन रुग्ण काही काळाने परत येतो. औषध मदत करू शकते, परंतु मुख्य कारण मनोकायिक आहे'' असे डॉ. निर्मला कजारिया म्हणत.

सात वर्षांच्या प्रॅक्टिसनंतर, डॉ. निर्मला यांनी आपली शक्ती आध्यात्मिक सेवेसाठी समर्पित करण्याच्या उद्दिष्टांनी औषधोपचार करणे बंद केले. १९७१ ते १९७८ पर्यंत, डॉ. निर्मला यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या यूके, आफ्रिका, झिम्बाब्वे, झांबिया आणि मॉरिशसमधील शाखांचे दायित्व सांभाळले. १९७५ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या एका संक्षिप्त दौऱ्यावर डॉ. निर्मला यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या ध्यान पद्धतीचा परिचय इतरांना करून दिला. १९७८ मध्ये, त्या ऑस्ट्रेलियाला परतल्या आणि आशिया-ऑस्ट्रेलिया क्षेत्रासाठी प्रादेशिक समन्वयक म्हणून पुढील तीस वर्षे तेथे सेवेत कार्यरत होत्या. २००९ पासून डॉ. निर्मला ब्रह्माकुमारी संस्थेच्या आध्यात्मिक मुख्यालयात, माउंट आबू, राजस्थान, भारत येथे संस्थेच्या वरिष्ठ पदावर होत्या. त्या आशिया-ऑस्ट्रेलिया क्षेत्राची देखरेख देखील करत आणि तरीही त्या ध्यानधारणा आणि आध्यात्मिक जीवनशैलीचे फायदे समजावून देत जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रवास करत असत. ज्या काळी भारतीय स्त्रिया सहसा नेतृत्वाची पदे भूषवत नसत त्या दरम्यान डॉ. निर्मला यांनी कौटुंबिक जीवनाचा मार्ग न चोखाळता स्वतःचा मार्ग सुनिश्चित केला. २०२१ पासून त्या ब्रह्माकुमारीच्या संयुक्त प्रशासकीय प्रमुख होत्या.

डॉक्टर आणि योगी:- त्यांना वैयक्तिक विकास आणि इतरांच्या कल्याणात विशेष रस होता. मानसिक आणि भावनिक संतुलन कसे वाढवता येते आणि ध्यानाने त्याला कसा आधार दिला जातो हे पाहून त्यांना भुरळ पडे. ध्यान केल्याने ताण-तणाव दूर होण्यास मदत होते आणि तणावाच्या आहारी जाण्याआधी त्याचे व्यवस्थापन कसे

करावे. ध्यान आपल्याला आपले विचार सकारात्मकपणे नियंत्रित करण्यास आणि आपला मानसिक दृष्टीकोन बदलण्यास मदत करते. त्यातून मन आणि शरीर त्यांचे योग्य संतुलन साधता येते. ध्यान हे सर्जनशील जीवन मार्गासाठी प्रतिभा आणि सद्गुणांचा विकास देखील सुलभ करते. असे त्यांचे ठाम विचार होते आणि अशा विचारांचे संक्रमण करण्यात त्या प्रयत्नशील असत.

शिक्षक आणि प्रशासक:– एक ज्येष्ठ राजयोग शिक्षिका या नात्याने, डॉ. निर्मला यांची भारतातील आणि परदेशातील ब्रह्माकुमारी समुदायामध्ये अतिशय स्पष्टतेने, साधेपणाने आणि व्यावहारिकतेने आध्यात्मिक संकल्पना समजावून सांगण्याची क्षमता होती. त्या जगभरातील ब्रह्माकुमारी केंद्रांना भेट देत, कार्यशाळा आयोजित करीत, आणि आध्यात्मिक सल्ला देत. डॉ निर्मला विविध समुदाय आणि व्यावसायिक नेते, सरकारी प्रमुख आणि इतर विचारवंत नेत्यांसह व्यासपीठ सामायिक करून प्रमुख परिषद आणि इतर कार्यक्रम संबोधित करीत. विविध वरीष्ठ प्रशासकीय भूमिकांमध्ये, डॉ निर्मला मोठ्या प्रमाणात आध्यात्मिक परिषदांच्या नियोजनात देखरेख करीत, आणि साधकांना प्रोत्साहन देत. भारतात, ब्रह्माकुमारीजच्या मुख्यालयात, त्या अकादमी फॉर अ बेटर वर्ल्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कॅम्पसच्या संचालिका होत्या.

ज्ञानसरोवर मध्ये सेवा करत असताना दीदी निर्मलांना मी २००० साली पहिल्यांदा भेटले. त्या पहिल्या भेटीतच मला त्यांचे वेगळेपण जाणवले होते कारण दीदी नावाप्रमाणेच निर्मळ मनाच्या होत्या. अतिशय गंभीर, मितभाषी परंतु समोरच्या व्यक्तीच्या मनाचा ठाव घेणारी नजर बघून बरेच जण दीदींना बघून घाबरत किंवा त्यांच्या बद्दल मनात गैरसमज करून घेत. परंतु मला मात्र त्या अतिशय भावल्या कारण त्या जे काही बोलत ते खूप परखडपणे आणि त्यांना जे वाटे तेच बोलत. मनात एक आणि ओठांवर दुसरेच असे त्या कधीही वागत नसत. समोरच्या व्यक्तीला खुश करणे हा त्यांचा उद्देश नसायचा; पण त्या व्यक्तीसाठी काय योग्य आहे आणि ते श्रीमतानुसार आहे की नाही हे त्या बघत. जेव्हा कोणी दीदींना भेटायला येत असे तेव्हा त्या अगदी जेवढ्यास तेवढे बोलत. जसे रुग्ण आजाराविषयी बोलतात तेव्हा डॉक्टर मधे मधे न बोलता सगळे ऐकून घेतो आणि मग उपचार करतो, औषध लिहून देतो अगदी त्या प्रमाणेच दीदी वागत. त्या लौकीक आणि अलौकीक अर्थाने खऱ्या डॉक्टर होत्या.

शिवबाबा त्यांना निर्मल आश्रम म्हणत. हे नाव देखील सार्थच होते. आपल्याला माहीत आहे आश्रम म्हटले की डोळ्यांसमोर येतो तो म्हणजे साधेपणा, मर्यादा आणि जिथे आध्यात्मिक आणि योगविषयक अभ्यास केला जातो. दीदी खूप साधेपणाने राहत, त्यांचे खाणे पिणे सुद्धा अगदी सात्विक असे. मला एक प्रसंग आठवतो. एकदा एक कार्यक्रम होता आणि दीदी स्टेजवर जाण्यासाठी हॉल मध्ये आल्या. मला वाटले की दीदींनी जरा चांगली साडी ठीकठाक करून स्टेजवर जावे. त्यांना जरा बाजूला नेले आणि त्यांची साडी ठीकठाक करून पदराला सेफ्टी पिन लावून दिली. हे सगळे करत असताना दीदींनी लहान मुलाप्रमाणे निरागसपणे सगळे करवून घेतले. मला म्हणाल्या, मला न पदराला पिन लावताच येत नाही, कधी लावलीच नाही. जरा मला पण शिकव बरे! मला खूप मज्जा वाटली त्यांचा हा साधेपणा बघून. हे सगळे पाहून इतर बहिणी आश्चर्यचकित झाल्या.

दीदी अगदी फणसाप्रमाणे होत्या. बाहेरून कठोर, खडबडीत वाटल्या तरी आणि आत गोड गोड गरे असतात तश्याच. आणि त्यांच्या ह्या मोहक रूपाचा अनुभव अनेक वर्ष घेण्याचं भाग्य मला लाभले आणि ते प्रत्येक कल्पामध्ये लाभणार ह्याचा मला फार फार आनंद होतो. आश्रमाप्रमाणे दिदीची दिनचर्या असे. काटेकोरपणे श्रीमतानुसार. ज्ञान, योग, धारणा, सेवा ह्या सगळ्यांचा समतोल दीदी साधत. सेवा आहे म्हणून जर कोणी मुरली किंवा योग चुकवत असेल तर दीदी त्यांना म्हणत सेवा तर करतच राहाल; पण ज्ञान आणि योग हा पाया आहे सेवेचा. उदा.: बाबा सांगतात वेळ आणि संकल्प यांची बचत करा, हे महावाक्य दीदी तंतोतंत आचरणात आणत. अमृतवेळेस योग, मुरली, ब्रह्माभोजन, नुमाशाम योग सगळे वेळेच्या वेळी. मुरलीचे पॉईंट्स त्या एक पाठकोऱ्या कागदावर लिहून आणीत. ज्ञानमुरलीच्या आधी मुरलीचे पॉईंट्स सांगून अगदी वेळेत म्हणजेच जास्तीतजास्त ४५ मिनिटांमध्ये पूर्ण करत कारण आम्ही सगळे सेंटर निवासी आणि क्लास मध्ये येणारे भाऊ-बहिणी सगळेच नोकरी करणारे. मुरली मध्ये उगाचच पाल्हाळ लावणे त्यांना आवडायचे नाही. दीदी जगभर

(पृष्ठ क्र.१५ वर)

बोध कथा

बोधकथा

(कथा – २)

ब्र.कु. मनोहर, गोरेगाव

''कधी विचार केलात का, आपण अति विचार करताच वाईट का घडते ?'' कारण –

आपण विचार करताच एखादी वाईट गोष्ट का बरे घडते ? कारण आपण चांगला, सकारात्मक विचार करू शकत नाही. आता वाचा कलाकाराची गोष्ट.

एका गावात एक माणूस राहायचा. त्याच्याकडे जगातील कोणत्याही प्रकारचे कुलुप उघडण्याची कला होती. ज्यांच्या चाव्याच अनेक दशकांपूर्वी, शतकांपूर्वीच हरवल्या होत्या, अशी अनेक कुलुपे त्याने उघडली होती. त्याच्याकडे खूप नवनवीन युक्त्या, क्लृप्त्या होत्या. त्यामुळे ती कुलुपं उघडणं त्याच्या डाव्या हाताचा मळ असे. त्यामुळेच लोकं त्याला कुलुपांचा बेताज बादशाहा असे म्हणायचे.

अशाप्रकारे त्याला वेगवेगळ्या सभा-समारंभात, ऐतिहासिक संशोधनात बोलावले जायचे, खूप लोक त्याला रेडिओ, दूरदर्शनवर, मोठ्या-मोठ्या कार्यक्रमात मुलाखतीसाठी बोलवत. त्यामुळे त्याची प्रसिद्धी, दूरवर पसरली होती. एकदा एका व्यावसायिकाने विचार केला, की ह्याला घेऊन एक मोठा कार्यक्रम, स्पर्धात्मक कार्यक्रम केला तर ! खूप लोक जमतील आणि त्याचा मोठा फायदा आपल्या व्यवसायाला देखील होईल. लगेच त्या कुलुपवाल्या बादशाहाला त्याने गाठले. त्याला कार्यक्रमाची संकल्पना सांगून एक लाख रूपये देऊ असेही सांगितले. त्याने लगेच होकार दिला.

कार्यक्रमाच्या ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी तो पोहोचताच त्याने बघितले की एका तरण तलावाच्या भोवताली खूप लोक बसले होते. आजूबाजूला मोठमोठे बॅनर होते, कॉमेन्ट्री चालू होती. सर्वच उत्सुक प्रेक्षक हातात भ्रमणध्वनी (मोबाईल) घेऊन सरसावून बसले होते. कुलुपवाला कलाकार तिथे पोहोचला. संयोजकांनी विचारले, 'तुम्हाला पोहायला येते का ? तो 'हो' म्हणाला.

त्याला सांगितले गेले, 'एका मोठ्या खोक्यात तुम्हाला बसायचे आहे. त्या खोक्याला आम्ही तरण तलावात ठेवून देऊ. खोका तळाशी जाताच तुम्हाला कुलुप उघडायला सुरूवात करायची आहे. कुलुप उघडले गेले नाही, तर बाजूलाच एक आपत्तीकालीन सूचनेचे बटन आहे. ते दाबा, म्हणजे आम्हाला कळेल, की तुम्ही संकटात आहात, तुम्हाला बाहेर काढण्यात येईल.

त्या कुलुपवाल्याला मोठे हसू आले. त्याचा अहंकारच हसत होता जणू ! कुलुप उघडता येणार नाही, मला ! शक्य आहे का हे ! 'अहो, हे तर १ मिनिटाचं काम आहे माझ्यासाठी. बघाच तुम्ही काय करतो ते !' मग त्याला त्या खोक्यात बसवून पाण्यात खोके सोडले तळाशी.. तिथे जाताच त्याने कुलुप उघडायला सुरुवात केली. पण कितीही प्रयत्न केले तरी कुलुप उघडेचना. सुरुवातीला क्षुल्लक वाटणारी गोष्ट कठीण आहे समजून त्या पाण्यात बॉक्समध्येही त्याला दरदरून घाम फुटला. मग शर्थीचे प्रयत्न सुरू झाले. पण छे ! सगळे उपाय, युक्त्या वापरूनही यश काही येत नव्हते. शेवटी आत दम घुसमटायला लागला. वरून हेही वाटत होते त्याला, की वरती एवढे लोक जमलेत, ते माझी टिंगल करतील, मला हसतील... काय करू, काय करू ? कितीही डोके फोडले, तरी कुलुप काही उघडेना.

शेवटी त्याने विचार केला. 'सिर सलामत तो पगडी पचास' 'जान हैं तो जहान हैं' – आधी जीव वाचवू मग ह्या कुलुपाचे व आपल्या इभ्रतीचा नंतर विचार करू ! त्याने लगेच सूचनेचे बटन दाबले. संयोजकांना कळले, आत काहीतरी गडबड आहे. त्यांनी लगेच खोका बाहेर काढला. त्या माणसाला बाहेर येताच मेल्याहून मेल्यासारखे होत होते.

लोक काय म्हणतील? हसतील का मला ? – अनेक विचार डोक्यात घेऊन मान खाली घालून उभा होता. खोका वर काढताना त्या कुलुपवाल्याचे खोक्याच्या एका बाजूला शरीराचे सर्व वजन गेले. त्या बाजूला नेमका दरवाजा होता. एका बाजूला वजन टाकताच ते दार उघडले. तेव्हा त्याला कळले की परीक्षा घेण्यासाठी ते कुलुप उघडणे फक्त एक नाटक होते, तो धावत संयोजकांकडे गेला आणि म्हणाला. तुम्ही आज मला माझ्या जीवनातला सर्वात मोठा धडा शिकवलात की कधी कधी जास्त विचार करणे ही घातक असते.

ही गोष्ट छोटीशी आहे, पण आपल्या सर्वांच्या जीवनाला लागू होते. जास्त विचार करण्याच्या सवयींमुळे खूप वेळा आपली नाती बिघडतात. आपणच विचार करतो, अरे अमुक व्यक्ती माझ्याबद्दल हा विचार करत असेल, तसा विचार करत असेल? असे तर झाले नसेल. तसे तर ....' सगळा आपणच जर-तरचा विचार करून त्रस्त होतो आणि त्या व्यक्तीशी बोलणे टाळतो.

जास्त विचारांमुळे आपण योग्य निर्णय करू शकत नाही, आपल्या उद्दीष्टांपर्यंत जाऊ शकत नाही. त्यामुळे सोप्या गोष्टी अवघड होत जातात. आपल्या विचारांवर ताबा मिळवण्याची साधना केल्यास जगातील इतर अनेक गोष्टी सहज साध्य होऊ शकतात.

***

(पृष्ठ क्र.१३ वरुन)

फिरल्या होत्या, साकार बाबांकडून मिळालेली शिकवण, देश विदेशाचा सेवेचा अनुभव होता; पण त्या कधीही त्याबद्दल स्वतःहून सांगत नसत. आम्ही कधी काही प्रश्न विचारले तरी अगदी संक्षिप्त वर्णन करीत. तसेच जर कोणी येऊन खूप काही बोलत पण दीदी अगदी एक दोन वाक्ये बोलत आणि निरोप घेत. संकल्पांची बचत पदोपदी पाहायला मिळे. एखादी गोष्ट घडून गेली की ती ड्रामा म्हणून फुलस्टॉप लावत.

मी जेव्हा ऑस्ट्रेलिया मध्ये सेंटरवर राहायला लागले तेव्हा दीदींनी मला एक मंत्र दिला. त्या मला म्हणाल्या, जर का तुला ह्या पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये राहायचे असेल तर ऑलराउंडर दादींकडून शिकलेला एक मंत्र मी तुला देते. तो मंत्र होता झुक झुक, सिख सिख, मर मर. त्याचा अर्थ आहे – मोठ्या कार्यासाठी आपले वैयक्तिक स्वार्थ, मानापमान बाजूला ठेवताना कचरायचे नाही. मला भारतीय संस्कृती आणि पाश्चिमात्य संस्कृती यांचा समन्वय साधायचा होता. दोन्ही संस्कृती मधील चांगल्या गोष्टी कशा माझ्या ईश्वरी जीवनात वापरुन माझे आणि सर्वांचे कल्याण करायचे हेच ध्येय ठेवले. ह्या मंत्रामुळे मला वाटते मी गेली १५ वर्षे ऑस्ट्रेलियामध्ये सेवा करून मी सुखासमाधानाचे जीवन जगत आहे.

दीदींचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्या खूप निर्मोही होत्या. म्हणजे बाबा न्यारा आणि प्यारा म्हणतात तसे. त्या कधी कुठल्याही व्यक्ति किंवा परिस्थितीच्या प्रभावात येत नसत. कोणाचेही म्हणणे शांतपणे ऐकून घेत आणि लगेचच त्या निरोप देत, जेणेकरून कुठल्याही प्रकारची भावनिक गुंतवणूक होऊ नये. त्यांनी खूप कठोर निर्णय खूप खंबीरपणे आणि शांत राहून घेतले. ९० च्या दशकात जेव्हा दीदी सिडनीमध्ये राहत होत्या तेव्हा तिथे सगळे हे ब्रह्मावत्स ऑस्ट्रेलियन होते. भारतीय किंवा हिन्दी बोलणारे दीदींशिवाय कोणीही नव्हते. जरी ह्या सगळ्या 'ब्रह्मावत्स'ना बाबांचे ज्ञान समजले होते तरी त्यांना वाटायचे की हे सगळे रिती-रिवाज हे भारतीय आहेत आणि त्यांना ते बदलायचे होते. म्हणजे मुरली जरी इंग्लिश मध्ये वाचत असले तरी सगळी गाणी हिन्दी, भोग लावणे किंवा प्रदर्शनीचे सगळी चित्रं ही हिंदू किंवा भारतीय आहेत. पण त्यांना हे कळत होते की इथल्या मंडळींना नक्की काय हवे ते अजून स्पष्ट नाहीय. मुरली झाली की दीदी आपल्या कामासाठी निघून जायच्या पण काही भाई आणि बहिणी मुरली रूम मध्येच बसून चर्चा करायचे दीदींच्या विरोधात. हे असे जवळ जवळ १० वर्ष चालू होते. आता त्यापैकी कितीतरी भाई बहिणी बाबांना सोडून गेले. मी एकदा दीदींना विचारले होते की त्या वेळी तुमची मनोवस्था काय होती? तेव्हा दीदी म्हणाल्या, सुदैवाने मी खूप साक्षी अवस्थेमध्ये राहू शकते. हे बाबांचे कार्य आहे आणि मी निमित्त आहे. हा निमित्तभाव मी कायम जपला म्हणून जरी माझ्या विरोधात म्हणजे यज्ञाच्या विरोधात असले तरी ती बाबांची मुलं आहेत आणि बाबा आणि ते बघून घेतील. मी साक्षी राहिले आणि ड्रामाचा पाठ पक्का केला. आज माझ्यासाठी हीच सगळ्यात मोठी आयुष्यभराची ठेव आहे आणि मी सदैव ती उरी बाळगून राहीन.

***

पसायदान

(भाग – ५)

ब्र.कु. ज्ञानेश्वर, पुणे

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानावरील चिंतन पुढे नेऊ या. मनातील जे वाकडेपण, रिकामेपण आहे ते निघाल्यावर आत काय भरायचे? त्यावर माउली सांगतात सत्कर्म करण्याची प्रत्येकाची इच्छा असते. कोणीच मुद्दाम दुष्कर्म करीत नसते. प्रत्येकाला वाटते मी चांगले कर्म करायला हवे. कुणी आनंदाने वाईट कर्म करीत नाही. दुष्कर्म करायला कोणीच स्वाभाविकपणे प्रवृत्त नसतो. कधीतरी संस्कारांच्या अधीन होऊन दुष्कर्म होते किंवा परिस्थितीमुळे आत्म्यात असलेले वाईट संस्कार उफाळून येतात आणि मग दुष्कृत्य घडते. कारागृहातील बंदींच्या मुलाखतींतून याचा फार मोठा प्रत्यय येतो. मनात कुठे नं कुठे अपराध भावना असते. सत्कर्मी रती वाढो.. पुष्कळ वेळा आपण भगवंताची पूजा करतो, नमस्कार करतो किंवा त्याच्याशी संवाद साधतो, ते घाबरून करणारे पुष्कळ असतात. इंग्रजीत आपण म्हणतो मी गॉड फीअरींग पर्सन आहे. परमेश्वराला घाबरणारा. आणि जर आपण पूजा घाबरून करत असू तर... जसे आपली मुले घाबरून आपल्यावर प्रेम करत असतील तर आपल्याला हे ऐकायलाही बरे वाटते का? सगळे जण देवाची लेकरे मग देवालाही भयापोटी आठवण काढणारी भक्त मंडळी आवडतील की प्रेमापोटी आठवण काढणारी? परंतु हा विचार आपण करत नाही. आपला उद्देश भीती पसरवणे हा नसतो. आपला उद्देश सुख, आनंद पसरवणे हा आहे. शांती पसरवणे. सत्कर्मी रती वाढो... जेव्हा परमेश्वराला आपण योग्य तऱ्हेने योग्य पद्धतीने जाणून घेऊ तेव्हाच खरा आनंद मिळेल. आपण पूजा पाठ करू, पण घाबरून केले तर त्याची फळे मिळत नाहीत, ते फलद्रुप होत नाही.

सत्कर्मी रती वाढल्यावर जे होते ते.. भुता परस्परे जडो। मैत्र जिवाचे...

एक दुसऱ्यासाठी प्रेम निर्व्याज प्रेम, आई-मुलाचे, पिता-मुलीचे प्रेम म्हणून भारतीय संस्कृतीमध्ये विश्वबंधुत्वाचे वर्णन आहे. विश्वबंधुत्व, फक्त भारत बंधुत्व नाही. आपण असेही म्हणतो भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. हे बंधुत्त्वाचे नाते आपण मान्य केले आहे. रक्षाबंधनाचे नाते सुद्धा भाऊ-बहिणीचे आहे. परंतु या शारीरिक नात्यांच्या पलीकडे आपण काही विचार करीत नाही. भुता परस्पर जडो मित्र जीवाचे. मैत्रीचे नाते म्हणजे आनंद, प्रेम, निर्व्याज निखळ आनंद. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्रीकृष्ण द्रौपदी यांचे नाते होते. सखा आणि सखीचे. सखा सखी चे नाते म्हणजे भाऊ बहिणीच्या नात्यापेक्षाही पवित्र आहे. कारण त्यात काही अपेक्षा नाही. इतर अनेक नात्यात अपेक्षा आड येऊ शकते. मैत्रीमध्ये हे बंधन नसते. मैत्रीतील मज्जा अद्भुत आहे. म्हणून माउली म्हणतात जे खळांची.... दुष्टपणा निघून जाऊन सत्कर्म वाढेल तर काय होईल? भूता परस्परे जडो मैत्र जिवाचे... अवघ्या सृष्टीवर मित्रत्त्व येईल, माधुर्य येईल, प्रेम येईल. आणि एकदा जर या गोष्टी आल्या तर नाती खूप सुंदर होतील. स्वर्गाचा रोड मॅप जो माउलींना अपेक्षित आहे आणि बनविला आहे त्याचा पहिला पॉईंट आहे मित्रत्त्व. संबंधामधील माधुर्य माउलींनी पसायदानामध्ये मागितले आहे. जेव्हा प्रत्येक मानवाकडे आपण आत्मिक दृष्टीने पाहू लागतो तेव्हा बंधुभाव जरूर होऊ लागतो. अन्यथा दैहिक दृष्टीमुळे हा पुरुष, ही स्त्री, हा हिंदू इत्यादी भावना व विचार नकळत उमटत जातात. लहान मुलांना आपसात खेळताना काळा-गोरा वगैरे असले भाव आड येत नाहीत कारण मुले देहभानापासून तशा अर्थाने दूर असतात. बंधुभावाचा हाच खरा पाया आहे. यावर अजून सखोल विचार पुढील भागात करूया. तोवर नाताळ आणि नववर्षाच्या शुभेच्छा!

***

नास्तिक कोण आणि खरा आस्तिक कोण?

ब्र.कु. प्रफुल्लचंद्र, सान डिएगो, अमेरिका

देव म्हणजे काय? जर आपण मानतो की देव अस्तित्वात आहे, तर देव कोण आहे? तो कसा आहे? कुठे आहे? त्याच्याशी आमचा काय संबंध? इ. प्रश्न विचारात घेण्यासारखे आहेत. कारण आज जगात देवाविषयी अनेक समजुती आणि विचारधारा प्रचलित आहेत आणि त्यातील काही अतिशय परस्परविरोधी समजुती आहेत. जसे नास्तिक-आस्तिकता; एकेश्वरवाद-अनेकेश्वरवाद; द्वैतवाद-अद्वैतवाद; अवतारवाद-बिनअवतारवाद, सगुण साकारवाद - निर्गुण निराकार इत्यादि. या परस्परविरोधी विश्वासांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे नास्तिकता आणि आस्तिकता. सर्वसाधारणपणे, जी व्यक्ती चैतन्य (आत्मा) आणि ईश्वराचे अस्तित्व मान्य करत नाही आणि देव किंवा आत्म्याचे कोणतेही अस्तित्व या जगात नाही अशी ज्यांची धारणा आहे ते नास्तिक. देव ही केवळ मानवी मनाची निर्मिती आहे, त्याला आपण निश्चितच नास्तिक म्हणू. दुसरीकडे, जी व्यक्ती देवाचे अस्तित्व स्वीकारते आणि कुठल्यातरी श्रद्धेनुसार कोणत्याही रूपात देव-देवता, किंवा एखाद्या धर्मस्थापकास परमेश्वरच मानून अथवा संत वा गुरूस परमेश्वर मानून स्मरण करतो तो सहसा आस्तिक मानला जातो, मग त्याला देवाचे खरे ज्ञान असो वा नसो. दर्शन म्हणजेच शास्त्रांच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांचे असेही मत आहे - पूर्वीच्या काळी वेदांना 'प्रमाण' मानणारे ते आस्तिक आणि या विचारधारेला विरोध करणारे ते नास्तिक अशी एके काळी धारणा होती. कालौघात ही व्याख्या बदलली.

आजही, हे दोन्ही वाद टिकून आहेत कारण नास्तिकास अद्याप कोणतेही तार्किक वा वैज्ञानिक प्रमाण मिळत नाही की ईश्वर अस्तित्वात नाही. त्याचप्रकारे आस्तिक सुद्धा काही सटीक तार्किक किंवा वैज्ञानिक प्रमाण नास्तिकाला देऊ शकले नाहीत की ईश्वर आहे, भेटा यांना. जरी नास्तिक देवाला मानत नाहीत आणि स्वतःला नास्तिक म्हणवतात. पण जाणूनबुजून किंवा नकळत कधी कधी ते देवाला स्वीकारतात. याबाबत एक गोष्ट प्रचलित आहे. एकदा नास्तिकांच्या एका संघटनेने विशेष सभा आयोजित केली. सभेतील चर्चेच्या विषयाची यादी (अजेंडा) होती - असे नेमके मुद्दे समोर आणावेत जेणे करून देव नाही हे सिद्ध करता येईल. बऱ्याच चर्चेनंतर प्रत्येकाने काही चांगले मुद्दे मांडले. आणि शेवटी सभेच्या नियंत्रकाने सर्व सभासदांचे आभार मानले आणि म्हणाले, देवाचे आभार, आज आपण हे सिद्ध करू शकलो की या विश्वात देव असे कोणीही नाही.

आता आस्तिकांकडे वळूया. वर म्हटल्याप्रमाणे, जे लोक ईश्वराचे अस्तित्व स्वीकारतात आणि श्रद्धा भावनेने त्याचे स्मरण करतात, ते सामान्यतः आस्तिक मानले जातात. भलेही त्याला देवाचे सत्य ज्ञान असो वा नसो. जो देवाचे अस्तित्व मान्य करत नाही त्याला नक्कीच नास्तिक म्हटले जाईल, पण जो देवाचे अस्तित्व कोणत्याही रूपात स्वीकारतो आणि श्रद्धा किंवा भक्तीने त्याचे स्मरण करतो किंवा त्याची पूजा करतो त्याला खरा आस्तिक म्हणता येईल का ?

यातील काहींच्या श्रद्धेचे स्वरूप अंधश्रद्धा ही असू शकते. जर आपण तर्कशुद्ध विचार केला तर आपण त्याला आस्तिक म्हणू शकतो; पण त्याला खरे आस्तिक कसे म्हणायचे? जो देवावर विश्वास ठेवतो, पण त्याविषयी सत्य जाणत नाही, त्याला खरा आस्तिक कसे म्हणता येईल?
जर आपण या संदर्भात विचार केला तर खरा आस्तिक कोणाला म्हणू शकतो :
(१) ज्याला भगवंताचे खरे ज्ञान आहे, तो कोण आहे ? कसा आहे म्हणजे त्याचे रूप काय ? कोठे आहे ? या

वैश्विक नाटकात त्याची भूमिका काय आहे? कुठल्या पद्धतीने? केव्हा आहे? का आहे? ज्यांच्याकडे या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे आहेत.

(२) शिवाय, मी कोण आहे तेही त्याला माहीत आहे. मी कसा आहे? मी कुठून आलो आणि कुठे जाणार? या जगाच्या व्यापारात माझा कोणता सहभाग आहे? माझ्या जीवनाचे ध्येय काय आहे? वगैरे.

(३) याशिवाय त्याला हेही माहीत आहे की, माणूस, निसर्ग आणि देव यांच्यात खेळल्या जाणाऱ्या या वैश्विक नाटकाचा आरंभ, मध्य आणि शेवट काय आहे? आणि हे नाटक कोणत्या मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे?

(४) जो निःस्वार्थ प्रेमाच्या नात्याने खऱ्या एका भगवंताशी जोडला गेला आहे आणि परमानंद आणि परमशांतीचा अनुभव घेत आहे. भगवंताचे श्रीमत अनुसरून ते भगवंताकडून अनेक सिद्धी प्राप्त करत आहेत.

वरील संदर्भात, जगातील करोडो लोक जे स्वतःला आस्तिक म्हणवतात ते खरेच आस्तिक आहेत का? जरी त्यांची देवावर श्रद्धा आणि भक्ती असली आणि अनेक प्रकारे त्याची उपासना करत असले तरी मी खरा आस्तिक आहे का? असे आपण स्वतःलाच विचारले पाहिजे.

हा महान बदल घडवून आणणे कोणत्याही मानवाला शक्य नाही परंतु या महान परिवर्तनाचे कार्य केवळ सर्वशक्तिमान ईश्वरच करू शकतो. या संक्रमणाच्या काळाला आपण कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा आरंभ या मधील बदलाचा काळ संगमयुग म्हणू शकतो.

सृष्टि चक्राच्या चार युगांच्या संदर्भात पाहिले तर, द्वापर-कलियुगात आपल्या जन्मात आपण खरे आस्तिक बनू शकलो नाही, परंतु आजचा काळ आपल्यासाठी पूर्ण खरा आस्तिक बनण्याची सुवर्णसंधी आहे. कारण या विश्व चक्रात कलियुगानंतर श्रेष्ठ सत्ययुग येते, म्हणजे कलियुगाच्या नाशानंतर सत्ययुगाची स्थापना होते.

यावेळी, सर्व धर्मांचे जनक, जगाचे नियंत्रक, प्रकाश बिंदु, परमात्मा शिव स्वतः ब्रह्मदेवाच्या शरीरात पृथ्वीवर अवतार घेतात आणि संपूर्ण जगाच्या आत्म्यांना स्पष्टपणे ओळखतात. आपण मानवी आत्म्याची ओळख करून देतो.

खरा आस्तिक असण्याबद्दल वर उल्लेखलेल्या काही प्रश्नांची स्पष्ट आणि नेमकी उत्तरेही तो देत आहे. या जगाच्या नाटकाचा आरंभ, मध्य आणि शेवट काय आहे? ते कोणत्या तत्त्वांवर काम करत आहे? संपूर्ण विश्वाचा भूगोल काय आहे? या सृष्टी नाटकात माझे किती जन्म आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरे सर्वज्ञ ईश्वर देत आहे. हीच ती वेळ आहे जेव्हा आपण देवाला खऱ्या अर्थाने ओळखतो, त्याच्या शिकवणुकीचे पालन करतो आणि खऱ्या अर्थाने आस्तिक बनतो.

आपण खरे आस्तिक बनून आपले जीवन दिव्य बनवूया आणि देवासोबतचे आपले सर्व नाते समर्थपणे अनुभवूया.

(अनुवाद: ब्र.कु. शीतल, कॅनडा)

***

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।

अर्थ : मानव, मनामुळेच बंधनाचा किंवा निर्बन्धन स्थितीचा अनुभव करतो. मनच एखाद्या गोष्टीत बांधून ठेवते. आध्यात्मिक दृष्ट्या बद्ध जीवाची काय लक्षणे आहेत? अशी व्यक्ती परवशतेचा म्हणजेच इंद्रियांच्या गुलामीचा अनुभव करते. आंतरिक आनंद व सुखाचा अभाव म्हणजेच गुलामी. सूक्ष्म जाणीवशक्ती कमतरता असणे म्हणजेच बंधन होय.

परीकथा

(भाग १२)

जसे बीज तसे फळ

ब्र.कु. रेखा, देगलूर

आता आमची राधा खूपच समंजस झाली आहे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांना परीच्या गोष्टी सर्वांना सांगू लागली. आता तिची पुढची गोष्ट खूप छान आहे ऐकाल ना? एके दिवशी मी व नंदिनीची आई असेच दुपारच्या वेळेस गप्पा मारत बसलो होतो. नंदिनीची आई म्हणत होती, आपल्या राम काकांनी देह ठेवला. ते नक्कीच मनुष्याच्या जन्मालाच जातील बघा कारण त्यांनी खूप दानधर्म पुण्यकर्म केली आहेत कोणाचं मन दुखावलं नाही त्यांनी. खूप प्रेमळ आणि शांत स्वभावाचे होते. मी म्हणाले, तसं काही नसते ताई !

एवढ्यात माझी राधा आमच्या सर्व गोष्टी ऐकून आमच्या जवळ आली आणि म्हणाली, "नाही काकू !" मनुष्य मेल्यानंतर मनुष्याच्या जन्मातच येतो. आपण त्या दिवशीही यावर बोललो होतो. परीने याबाबत मला अजूनही काही सांगितलंय. काकू म्हणाल्या, "राधा बाळ आपण बोललो होतो; पण तरी सुद्धा मनांत थोडा गोंधळ होतो. परवाच टीव्हीवर एका सत्संगातील प्रवचनात ८४ लक्ष योनीतून होणारा प्रवास सांगत होते. तू एवढ्या विश्वासाने कसं काय सांगू लागलीस? तुला काय माहीत आहे. शास्त्र पुराणातल्या गोष्टी मी वाचल्या आहेत." राधा काकूच्या जवळ जात म्हणाली, "काकू मी या सर्व गोष्टी सांगत नाही; पण कालच माझ्या स्वप्नात माझी परी आली होती. तिने मला हे सर्व सांगितले बघा, मग मी बाबांना सांगितले. बाबांनी सुद्धा मला हे सांगितलं की तुझ्या परीचं सर्व काही अगदी बरोबर आहे." काकू म्हणाल्या, "मग बाळा मला सांग ना तुझ्या परीने तुला काय काय सांगितलं ते." राधा गोष्ट सांगणार एवढ्यात काकू पुन्हा म्हणाल्या, "बाळा मला तर एवढं माहीत आहे की शास्त्र पुराणात म्हटलंय, ८४ लाख जन्म झाल्यानंतर आपल्याला हा नरदेह मिळतो. सर्व पशु पक्षांच्या योनीत जन्म झाल्यावरच हा मनुष्य देह आपल्याला मिळतो. त्यामुळे आपला हा जन्म हिऱ्याप्रमाणे अमूल्य आहे." राधा म्हणाली, काकू परी म्हणाली, "आपण जर शेतात किंवा घराच्या जवळ आंब्याची कोय लावली तर त्या झाडाला कुठली फळे लागतील?" मी हसत हसतच म्हणाले, "अग परी आंब्याची कोय लावली तर त्या झाडाला आंबेच लागणार नाहीत काय? काय मिरची लागेल?" त्यावर परी पण हसली म्हणाली, "जसं आंब्याची कोय पेरल्यानंतर त्या झाडाला आंबेच लागतात ना! मनुष्य हा मनुष्याच्या जन्माला येतो. या जन्मी स्त्री देह असेल तर पुढल्या जन्मी पुरुषदेह होऊ शकतो इतकाच काय तो बदल होतो. मी तर तुला सत्ययुग, त्रेतायुग द्वापर आणि कलियुग तसेच संगम युगाच्या गोष्टी सांगितल्या यावरून असे सिद्ध होते की मनुष्य ८४ लाख नाही तर जास्तीत जास्त ८४ जन्म घेतो.

मी म्हणाले, "बरोबर आहे. मागच्या गोष्टीत तू सर्व सांगितलेस ना." परी म्हणाली, "बाळा मनुष्य जर आपल्या पापकर्माची फळे पशुपक्ष्याच्या योनीत भोगत असेल तर, प्रत्येक मनुष्य हा कधी दुःखी अशांत का असतो? तो तर पशुपक्ष्याच्या जन्मात सर्व काही भोगून येतो मग येथे सुखी असायला पाहिजे. पशु पक्षांना उलट दुःख कमी होत असावे. मनुष्याहून ते जास्त सुखी भासतात. व्यथा वेदना ना चिंता छान स्वच्छंदपणे ते उडतात जे मिळेल ते खातात त्यांना भविष्याची चिंता नसते. आणि भूतकाळावर ते विचार करत बसत नाहीत. शहरातील मनुष्य तर पक्ष्यांसाठी / प्राण्यासाठी अन्नाची सोय करतात. कुणी कबुतरांना दाणे घालतो कुणी कुत्र्यांना पोळी कुणी मांजरांना दूध पाजतो. पक्षी घरट्यात किंवा झाडावर ते शांतपणे झोपतात." काकू म्हणाल्या, "अगदी बरोबर आहे. आमचे राम काका सुद्धा छतावर पक्षांसाठी अन्न ठेवत. पाणी सुद्धा

(पृष्ठ क्र.२५ वर)

मन वळवा

ब्र.कु. दिपाली, लोणावळा

"जहाँ लॉजिक खतम होता है वहाँ मॅजिक शुरू होता है।'' हे वाक्य मला फार आवडते कारण लॉजिक करणारेही आपणच असतो आणि मॅजिक करणारेही आपणच असतो. पण, स्वत:चेच चिंतन आपण करत नाही म्हणून या दोन्हीं गोष्टींपासून आपण दूर जातो. म्हणून, स्वचिंतन करण्यासाठी आपण पुन्हा एकदा गीतामातेच्या श्लोकाचा आधार घेऊया. भगवद्गीतेचा एक श्लोक आहे.

उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ।

आत्मैव, ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः अ.६, श्लोक ५

भावार्थ – स्वत:च स्वत:च्या संसारसमुद्रातून उद्धार करून घ्यावा आणि स्वत:ला अधोगतीला जाऊ देऊ नये. कारण हा मनुष्य स्वत:च स्वत:चा मित्र आणि स्वत:च स्वत:चा शत्रू आहे.

या श्लोकाचा नीट अभ्यास केला तर स्वचिंतन करण्यास मदत होईल. स्वत:च स्वत:चा मित्र आणि शत्रू आपण कसे असतो यावर नीट विचार केला पाहिजे. त्यासाठी स्वत:च्या चांगल्या आणि वाईट सवयी शोधल्या पाहिजेत. एक सरळ साधीशी गोष्ट पाहूया–

'ए मूर्ख आहेस का? किती बावळट आहेस तू? तुला काही अकलेचा पत्ता आहे का? तुझ्या डोक्यात काय कांदे–बटाटे भरलेत का? तुझ्या बुद्धीला काय भोकं पडलीत का?'

कसे वाटतात हे शब्द ? कानाला नकोसे वाटतात ना? पण बोलतो आपणच ना काय मिळतं या बोलण्यातून, तर आपलंच तोंड खराब होतं, समोरच्याचं मन दुखावलं जातं आणि सगळं वातावरण दूषित होतं. दूषित हवा, दूषित पाणी, दूषित अन्न आपल्याला नको असतं मग दूषित बोल बोलणं आपल्याला शोभतं का?

तुम्ही कधी एखाद्या पाण्याच्या ठिकाणी फिरायला गेलात का? जसं की धरण, नदी, तलाव किंवा विहिर. पाणी एकदम शांत, स्थिर असलं की आपल्याला त्यात एक खडा टाकावसा वाटतो आणि त्या शांत पाण्याला आपण वलयांकित करून अशांत करतो किंवा काहीजण खडा टाकून पाण्याच्या खोलीचा अंदाज घेतात. त्याचप्रमाणे आपण असे शब्दांचे खडे टाकून वातावरण अशांत करतो. ज्याप्रमाणे वातावरणात खडा टाकल्यावर वलय तयार होतात. त्याप्रमाणे आपल्या बोलण्याचेही वलय तयार होतात. त्याला वायुमंडळ किंवा vibrations असेही म्हटलं जातं. जर आपल्या बोलण्याने असे वायुमंडळ तयार होत असेल तर त्याचा परिणाम आपल्यावर आधी होईल की समोरच्यावर? नक्कीच आपल्यावर, मग, त्याचा परिणाम आपल्या मनावर आणि मग, शरीरावर. त्यासाठी लक्षपूर्वक आपण काय करतो, काय बोलतो यावर लक्ष असणे गरजेचे आहे. अशाच छोट्या छोट्या गोष्टी स्वत:च्या शोधून काढल्या तर स्वत:चे चिंतन सुरू होईल.

अशा छोट्या छोट्या गोष्टी जेव्हा आपल्याकडून होतात तेव्हा ते आधी विचारांच्या रूपात आपल्या मनात घर करत असतात. आणि सगळा खेळ होतो. या मनाच्या घरात म्हणून आपल्या मनाला धावता घोडा किंवा मर्कट मन म्हटलं जातं कारण ते नुसतं विचारांच्या मागे पळत असत, त्याचं हे पळणं थांबवणं गरजेचे आहे – स्वचिंतनाने.

जग कुठं चाललयं, माणसं कशी वागतात, कोण काय करतंय, आजूबाजूला काय घडतंय याचा तर्क किंवा लॉजिक लावण्यापेक्षा मी काय करतोय, मला काय केलं पाहिजे याचा अभ्यास केला तर नक्कीच आपल्या जीवनात मॅजिक होईल.

आपलं मन हे आपल्या जीवनाचं मॅजिकल घर आहे. तिथे निर्माण होणारे विचार आपल्या व्यक्तिमत्त्वांवर प्रभाव

टाकत असतात. म्हणून या मॅजिकल घराला समर्थ विचारांची जोड दिली तर नक्कीच आपल्या आयुष्यात जादू होऊन जाईल.

ती गोष्ट माहीत आहे का जेव्हा कुंभकर्णाला इंद्रासन मागायला सांगितले तेव्हा त्याच्या तोंडून इंद्रासनच्या जागेवर निद्रासन आलं आणि सहा-सहा महिने तो निद्रावस्थेत राहू लागला. असंच आपलं झालंय. पाहिजे काय किंवा करायचं काय होतं आणि घेऊन काय जातं. म्हणून, मन स्वच्छ ठेवणं गरजेचे आहे.

अगं ऐकलसं का? सांगू नकोस हं कोणाला, तुला माहीत आहे का असं असं झालंय, अशा गुज गोष्टी करायला आपल्याला छान वाटतं; पण त्यामुळं आपलं मन तर खराब होतचं शिवाय त्या व्यक्तिबद्दलचा दृष्टिकोनही बदलतो. कुणाच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच पडताळणी केलेली नक्कीच योग्य ठरते. त्यांच्याकडे एवढी संपत्ती, बँक बॅलन्स, दागिने आहेत, त्यांना कसली कमतरता. आपलं नशीब मात्र फुटकं. अशा असूयेने जर मन भरलंय तर नशीब फुटकं असणार. नेहमी लक्षात ठेवा की, जे आपण बोलतो त्यांचं वलय आपल्याच भोवती निर्माण होत असतं म्हणून मनाला अशा परचिंतनाची सवय लावण्यापेक्षा स्वचिंतनाची सवय लावा.

कधी निसर्गाला निरखून पाहिलं का? सूर्य नित्यनियमित असलेलं काम करतो. चंद्रालाही कळतं अमावस्या आणि पौर्णिमेनुसार आपलं स्वरूप बदलायचं, झाडांना वृक्षांनाही कळतं मला दगड मारला तरी मला सावली आणि गोड फळंच द्यायची. ऋतुही त्यांच्यानुसार क्रमाने येत-जात असतात. पण, यातलं काहीही आपण करत नाही. ना सूर्यासारखं नित्यनियम ठेवत, ना परिस्थितीनुसार चंद्रासारखं बदलतो, ना वृक्षासारखं निःस्वार्थ देण्याचं काम करतो. ऋतुनुसार सुखदुःख येतात आणि जातात; पण त्यातून नवी प्रेरणा घेण्याऐवजी दुःख कवटाळत बसतो आणि जगण्याचा अर्थच विसरून जातो.

आपण स्वतःच स्वतःला नकारार्थी गोष्टीत ढकलतो आणि दुःख-चिंता करत बसतो म्हणून भगवद्‌गीता आपल्याला सांगते माणूस स्वतःच स्वतःचा मित्र आणि शत्रू असतो. म्हणून, स्वतःच स्वतःचा शिक्षक होऊन आधी स्वतःला मानसन्मान देऊन स्वतःला घडवलं पाहिजे. मगच दुसऱ्यांना घडवण्याचा आपल्याला अधिकार असतो आणि खरं सांगू का दुसऱ्यांना घडवण्याची आपल्याला गरजच नसते. आपलं आचरणच दुसऱ्याला घडवत असते. म्हणून आपले साधुसंत सांगून गेलेत परचिंतन करू नका.

आपला बँकेत किती पैसा आहे हे शोधण्यापेक्षा आपल्या मनाच्या बँकेत किती चांगल्या गोष्टी आहेत ते पहा. तुम्ही बँकेतला पैसा कुणाला देऊ शकत नाही; पण मनाच्या बँकेतून चांगल्या, शुभ भावना, आशीर्वाद तर नक्कीच देऊ शकता. बँकेतल्या पैशाने नवीन वस्तू घेऊन घराला मॅजिकल बनवू शकतो, पण मनातल्या शुभ विचारांनी विश्वात स्वतः मॅजिक करू शकतो. कारण इथे पैसा वेळ लागत नाहीत तर एक चांगला विचार, चांगला संकल्प लागतो. कारण त्या संकल्पाने आधी स्वतःभोवती चांगलं वलय तयार होईल आणि मग ते विश्वात सामावेल - झाले ना मग मॅजिक.

मग असं मॅजिक कराला ना? आपलं मन स्वच्छ निःस्वार्थी शुद्ध, शुभ भावनेने भरा. अगदी त्या परमेश्वरासारखं. मन शुद्ध तर बुद्धी ही शुद्ध. मग बुद्धीने केलेला निर्णयही शुद्ध. मग नक्कीच यशाचं मॅजिक आपल्या हातात. मग ठरवा तर लॉजिक मस्त का चांगल्या संकल्पाचं मॅजिक मस्त.

एक गृहपाठ तुमच्यासाठी - चिंतन करू.

कमीत कमी विचार निर्मिती. जेव्हा व्यर्थ गोष्टींकडे मन धाव घेईल तेव्हा त्याची दिशा वळवायचा प्रयत्न करा. जिथे ब्रेक लावता येईल तिथे लावा.

लॉजिक मस्त का मॅजिक मस्त
जगण्याचा अर्थ समजून त्याला करा फस्त
हा खेळ सारा मनातल्या संकल्पांचा
निर्माण होण्याऱ्या त्याच्याभोवती वलयांचा
सोडून देऊ विषय - परचिंतनाचा
गरज आहे फक्त - स्वचिंतनाचा
प्रभाव पाडणे आहे आपल्या आचरणाचा
हा खेळ सारा मनातल्या संकल्पांचा
कोण काय करतो याचं का लावता लॉजिक
माझं मन स्वच्छ आहे हेच खरं मॅजिक
करून पहा प्रयोग एक, होऊन स्वतःसाठी भावूक
खरच सांगते
हा खेळ सारा मनातल्या संकल्पांचा
निर्माण होणाऱ्या त्यांच्याभोवती वलयांचा

***

वाचन संस्कृती

ब्र.कु. प्रज्ञा, ठाणे (पू.)

डिजिटल स्क्रीनवर वाचन करण्यामुळे काय फायदे आहेत आणि तोटे काय आहेत? डिजिटल वाचनामुळे डोळ्यांवर, मनावर आणि मेंदूवर काय परिणाम होतात? या विषयावर साधक-बाधक विचार करायचा हा एक प्रयत्न आहे.

वाचन ही कला फार जुनी आहे. कदाचित दोन-अडीच हजार वर्षे तरी जुनी नक्कीच आहे. त्या काळी भूर्जपत्रांवर लिहिले जात असे. तेव्हापासून आजवर आपल्या वाचन पद्धतीत काळानुसार बदल होत गेले. वाचनाच्या बाबतीत काही विचार सांगितले जातात.

कुणाला कशी तर कुणाला कशी वाचनाची सवय असते. कुणी निवांतपणे वाचन करतो तर, कुणी गर्दीच्या ठिकाणी, कुणी झोप येत नाही म्हणून वाचन करतात. एके काळी वाचन हे जीवनाचे अविभाज्य अंग होते. १) काही वाचक हे स्पंजासारखे असतात. जे समोर येईल ते सर्व शोषून घेतात. वाचतात व ते जसंच्या तसं किंबहुना थोडंसं वाईट स्थितीतच त्यांच्याकडून बाहेर टाकलं जातं. २) काही वाळूच्या घड्याळाप्रमाणे असतात. आपण अद्ययावत आहोत, काळाबरोबर आहोत हे दाखवण्यासाठी वाचतात. त्यातलं काहीच त्यांना स्पर्श करू शकत नाही. ३) काही वाचक एखाद्या गाळण्याप्रमाणे असतात. नको तेवढंच त्यांच्या लक्षात राहतं किंवा धारण करतात. ४) आणि काही मात्र खानदानी हिऱ्याप्रमाणे दुर्मीळ आणि मौल्यवान असतात. आपल्या वाचनाद्वारे स्वतःचे आणि इतरांचे जीवन मन उजळून टाकतात, फायदा करून देतात. वाचनसंस्कृती विषयी संतांनीही वर्णन करून ठेवले आहे. समर्थ रामदासांनी म्हटले आहे,' दिसामाजी काही तरी लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे'. पण किती जण वाचतात आणि किती लोकांना आता वाचनाऐवजी मोबाईलद्वारे ऐकण्याची सवय अधिक लागली आहे? हा संशोधनाचा विषय आहे.

आताच्या काळात कागदावरच्या मजकुराऐवजी इलेक्ट्रॉनिक पडद्यावरचे वाचन जास्त होते. मोबाईल, संगणक इत्यादी उपकरणांचा वापर जास्त होत आहे. विशेष करून करोना साथीनंतर या उपकरणांच्या वापराचे प्रमाण अधिकच वाढले आहे. प्रत्येकाच्या खिशात हल्ली स्मार्ट फोन असतो. त्यात दिवसभरातल्या घडामोडींचा अद्ययावत तपशीलही येत असतो. आपण जिथे असू तिथे आरामात वाचता येते. कागद निर्माण करण्यात मोठी लाकूडतोड होते ती डिजिटल माध्यमात टाळता येते असाही एक युक्तिवाद मांडता येईल.

खरे तर डिजिटल माध्यमांद्वारे वाचनाचे काही फायदे आहेत ते नाकारता येणार नाहीत. उदा. पुस्तकाची प्रत सर्वत्र उपलब्ध असेलच असे नाही. पण इंटरनेटवरून तेच पुस्तक उतरून (डाउनलोड) घेणे सोपे झाले आहे. पुस्तकाच्या कागदी प्रतीपेक्षा डिजिटल प्रत थोडीशी स्वस्तही मिळते. फोन किंवा टॅब्लेट मध्ये अनेक पुस्तके संग्रहित करता येतात. म्हणजे जागेचाही प्रश्न सुटतो. पुस्तकांची निगा राखण्याऐवजी (वाळवीसारख्या गोष्टींपासून संरक्षण करणे) डिजिटलमध्ये ठेवणे सोपे आहे. पण काही संशोधनानुसार डिजिटल वाचनाचे काही तोटेही आहेत. जर भावनिक आणि समजण्यास कठीण असलेल्या विषयावरचे लिखाण फोनवर किंवा इलेक्ट्रॉनिक पडद्यावर वाचत असाल तर अशावेळी आकलन क्षमता कमी होऊ शकते. इलेक्ट्रॉनिक पडद्यावर वाचन करताना त्यातून निघणारे इलेक्ट्रॉन्स, डोळ्यांवर आणि मेंदूवर अनिष्ट परिणाम करतात हे सर्वश्रुत आहे.

डिजिटलायझेशनच्या परिणामांवर संशोधन करण्यासाठी जगातील तीसहून अधिक देशातील काही तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ मंडळी एकत्र आली. त्यांच्या मते स्मार्ट फोनवर आपण बातम्यांचे वेचे पाहतो, एखादी गोष्ट चटकन इंटरनेटवर शोधतो आणि आपले कामही होते. पण गहन

विषयांवरचे लिखाण किंवा एखादा जटिल विषय इलेक्ट्रॉनिक पडद्यावर वाचणे आणि पुस्तकाच्या द्वारे वाचणे यात मोठा फरक आढळतो. पुस्तकाद्वारे वाचण्याने झालेले आकलन वरच्या श्रेणीचे असते असे दिसून आले आहे. अमेरिकेत 'सॅपियन लॅब' नावाची न्यूरोसायन्स क्षेत्रात काम करणारी प्रयोगशाळा आहे. त्यात माणसाची वर्तणूक आणि मनाचा संज्ञानात्मक प्रतिसाद याबाबत काही प्रयोग केले जातात, संशोधन केले जाते. त्यांच्या एका अहवालानुसार लहान मुलांना स्मार्ट फोन दिला तर त्याचे परिणाम (की दुष्परिणाम?) तरुण वयात दिसून येतात असे आढळले. 'सायंटिफिक अमेरिका' या नियतकालिकेतील एका प्रकाशित अहवालानुसार जेव्हा आपण एखाद्या कागदाऐवजी स्क्रीनवरचा मजकूर वाचतो तेव्हा आपला मेंदू जास्त थकतो आणि स्क्रीनवरचा मजकूर लक्षात ठेवण्यास थोडे कठीणही पडते. अशा वाचनाचा परिणाम मनावरही पडतो हेही तितकेच खरे आहे. वाचनातून मन:पटलावर निर्माण होणारे दृश्य आणि भावना यांचा मोठा सहभाग आपली मते बनण्यात होत असतो. त्यामुळे आपण कोणत्या माध्यमातून वाचतो, काय वाचतो आणि किती वाचतो या सगळ्याचाच एकत्रित परिणाम व्यक्तिमत्त्व घडण्यात होत असतो हे नक्की.

डिजिटलाझेशन ही अगदी अलीकडची गोष्ट आहे. त्या तुलनेत कागदावरचे लिखाण वाचणे ही शतकानुशतके जुनी गोष्ट आहे, त्यामुळे त्याचा पगडा समाजावर मोठा आहे. पण जी तरुण पिढी आहे, ज्यांना 'मिलेनिअल्स' म्हणतात म्हणजे जी मुले-मुली वर्ष २००० च्या नंतर जन्माला आली आहेत त्या पिढीला स्क्रीनवरचे वाचन जास्त अंगवळणी पडलेले आहे त्या मानाने आधीच्या पिढीतील लोकांना कागद हे माध्यम सोपे वाटत असावे. असा एक युक्तिवादही कुणी मांडल्यास गैर नाही. वाचनाचे काही ठळक फायदे मात्र नक्कीच आहेत. उदा. वाचनाने, आपली मते आपण अधिक स्पष्टपणे बनवू शकतो. सर्जनशीलता आणि तर्कसंगत विचाराचा पाया निर्माण करू शकतो. मानवी मन प्रगल्भ होण्यात वाचनाची नक्कीच मदत मिळते.

थोडक्यात काय तर वाचनाची सवय सोडू नका. सवय नसल्यास ती जडवण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला एखादे पुस्तक ऑनलाईन वाचायला आवडते की ऑफलाईन ते सांगा; पण वाचाल तर वाचाल.

इंग्रजीत एक छान वाक्य आहे - Reading makes full man म्हणजे वाचनाने माणूस समृद्ध होतो हे मात्र खरे.

(आधार: यु ट्यूब वरील काही माहिती आणि इतर)

एक तरी दोहा अनुभवावा

काळाविषयी कबीरांचे चिंतन

टालै टुलै दिन गयो, ब्याज बढन्ता जाय । ना हरि भजा ना खत कटा, काल पहुँचा आया ।।

या मनुष्य जीवनाचा मूळ हेतू दुःखाच्या फेऱ्यातून मुक्त होणे हा आहे, परंतु टाळाटाळीमध्ये आणि टोलवाटोलवीमध्येच सर्व दिवस निघून जातात. हातून काहीच घडत नाही आणि उलट सांसारिक कर्मांमुळे दोष वाढतच जातो. एकीकडे सांसारिक कर्मांची पूर्तता होत नाही आणि दुसरीकडे परमात्म साधना करू शकत नाही. एवढ्यात काळ आपल्या डोक्यापर्यंत येऊन पोचतो.

जरा कुत्ता जोबन ससा, काल अहेरी नित्त । दो बैरी बीच झोंपडा कुशल कहाँ सो मित्त ।।

वृद्धावस्था कुत्र्यासारखी, युवावस्था सशासारखी असते. याच्यात काळरूपी शिकाऱ्याने, तारूण्यरूपी सशावर म्हातारपणरूपी कुत्र्याला आपल्या शिकारीसाठी कायमस्वरुपी सोडलेले आहे. आता एकीकडे म्हातारपण आणि दुसरीकडे काळ (मृत्यू) अशा दोन शत्रूंच्यामध्ये तुझे घर आहे. म्हणून हे मित्रा, तू आता सुरक्षित नाहीस. तू यातून वाचू शकत नाहीत.

पात झरन्ता यौं कहै, सुन तरूवर बन राय । अबके बिछुडे ना मिल, दूर पडेंगे जाय ।।

झाडावरून गळणारे पान म्हणते, हे विशाल वनातील वृक्षराज ! हा काळाचा फेरा आहे आणि आपण नाईलाजास्तव एकमेकांपासून दूर होत आहोत. पण आता आपण एकमेकांपासून दूर गेलो तर, पुन्हा कधी भेटणार नाही. या जगातील जीवसुद्धा असेच एक दुसऱ्यापासून दूर होत असतात.

अनुवाद : बी.के.प्रा. दिनेश डांगे, कोल्हापूर

प्रश्नोत्तरे

(भाग ५)

ब्र.कु. सूरज, आबू रोड

प्रश्न : ब्रह्माकुमारीमध्ये राजयोगात ध्यानधारणा डोळे उघडे ठेवून का करतात?

खूप लोकांच्या मनात हा प्रश्न नेहमी येतो, की बाकी अनेक सत्संगात डोळे बंद करून ध्यान करायला सांगतात मग इथेच का बरे डोळे उघडे ठेवून ध्यान करायचे? ब्र.कु. डोळे उघडे ठेवून (योग) ध्यान तर करतातच, शिवाय एकमेकांना (डोळ्यात डोळे घालून) दृष्टि ही देतात. असे का बरं? काही लोक तर असेही म्हणतात की ब्रह्माकुमारी डोळ्यात डोळे घालून दृष्टि देण्याच्या बहाण्याने जादू करतात.

उत्तर : आता आपण हे जाणून घेऊया की दृष्टिमध्ये काय जादू आहे – हे गुपीत आज मी तुम्हांला सांगणार आहे. बघा हं म्हणजे कोणतीही घन वस्तू आपण हाताने पकडतो. त्याचा स्पर्श आपल्याला जाणवतो. अशाच प्रकारे ज्या सूक्ष्म गोष्टी असतात, उदा. वायू लहरी म्हणतात, जसे प्रेमाचे, सुख–शांतीच्या लहरी (तरंग), आनंद लहरी – ह्यांच्या लहरी जर पकडायच्या असतील तर ह्या जड शरीराद्वारे ते शक्य नही. ते ह्या शरीरातील आत्मा जी चैतन्य शक्ती आहे ती ते डोळ्यांद्वारे सहज पकडू शकते आणि त्याची आंतरिक अनुभूती करू शकते. हे सर्व कसे होते हे समजण्यासाठी मी तुम्हाला काही उदाहरणे देतो – आता समजा, कुठे दुःखाचं वातावरण आहे, जसे लग्नमंडपात मुलीच्या सासरी जाण्याचा प्रसंग असो, कुठे कुणी देह त्यागला असेल, – अशा प्रसंगी सगळेच रडत असतात. अशा वातावरणात थोडा वेळ आपण ही तिथे उभे असाल, तर आपणांसही त्या दुःखी वातावरणाची झळ येतेय असे वाटेल, उदास वाटेल, रडू येईल. गावात ह्या गोष्टी नेहमी आढळून येतात, अशा प्रसंगी येणारे बाहेरचे लोकही रडू आवरू शकत नाहीत.

आता दुसऱ्या प्रसंगात आनंदाचे वातावरण आहे. त्याच्याशी तुमचा संबंध असो की नसो, तुम्हालाही त्या आनंदी वातावरणामुळे छान वाटेल. तसेच कुणी जर बसल्या बसल्या जांभया देत असेल, तर तुम्हालाही लगेच जांभया यायला सुरुवात होते. याचप्रमाणे कुणी गाडी चालवत असेल आणि बाजूला बसून कुणी झोपा काढत असेल तर तो चालक अशा माणसाला बाजूला बसू देत नाही. त्याला तो मागे बसायला सांगतो. मागे बसून तो झोपू दे त्याला ते दिसणारही नाही, आणि काही फरकही पडणार नाही – तर हे असे का होते? कारण दुसऱ्याला शेजारी झोपलेले बघून चालकाला झोप येऊ शकते. आणि मग अपघाताची शक्यता बळावते.

अशाप्रकारे वरील सर्व उदाहरणांवरून आपल्याला म्हणता येईल, आपण जे काही बघतो, ते डोळ्यांद्वारे ग्रहण करतो. अजून एक उदाहरण – आपण जर वाईट विकारी दृश्ये असलेले मासिक, चित्र किंवा सिनेमा बघतोय, तर ते डोळ्यांद्वारे आपल्यात वाईटपणा आणू शकते. आपल्यातही तशाच विकारी भावना जाणवू लागतात. तसे विचार, भावना उत्पन्न होतात. जे काही डोळ्यांद्वारे आपण बघतो, त्याची वृत्ती, तरंग शरीरात जाणवायला लागतात.

जर एखाद्या देवीचे चित्र आपण बघितले आणि कमी कपडे घातलेल्या वाईट हावभावाच्या बाईचे चित्र आपण बघितले, तर दोन्हीद्वारे आपल्या मनोवृत्तीत नक्कीच फरक जाणवेल. देव–देवतांच्या चित्राकडे, मूर्तीकडे किंवा त्यांच्या देवळात आपणांस अतिशय शुद्ध वृत्ती जाणवेल. मन शुद्ध पावन होतेय वाटू लागेल. पवित्रतेच्या लहरी जाणवतील आणि देहाचे प्रदर्शन करणाऱ्या कुणा नटीचे चित्र बघताय तर कसे वाटते ते तुम्हाला आता नक्कीच कळले असेल. तसेच कुणी आपल्यावर प्रेम करतंय की घृणा हे आपल्याला त्याच्या चेहऱ्याकडे, विशेषतः त्याच्या डोळ्यांकडे बघूनच कळते. (प्राण्यांनाही डोळ्यांद्वारे, लहरींद्वारे हे लगेच कळते

– आपल्यापेक्षा जास्त) म्हणजेच जर कुणी एकमेकांवर प्रेम करतंय ते डोळ्यांनीच जाणवतं एकमेकांना. जनावरांना भाषा जरी कळली नाही, तरी प्रेमाची भाषा डोळ्यांद्वारे कळतेच, रागावले तरी ते समजू शकतात. तर ह्याच पद्धतीने कुणी योगी आत्मा खूप चांगल्या योग स्थितीत असेल, आपल्या तन-मनाला विसरून परमेश्वराच्या प्रति पूर्ण समर्पित असेल, परमात्मा मिलन प्रेमाच्या अनुभूतीत रत असेल – सुख – शांती – पवित्रता – आनंद – प्रेम – शक्ती ह्यांच्या अनुभूतीत दंग असेल, तर अशा योग्याच्या डोळ्यांद्वारे अशाच लहरी, तरंग वातावरणात पसरत असतात. अशांचे तरंग आपण घेतले तर आपणासही असेच वाटते. म्हणजेच जर एखादी व्यक्ती परमेश्वराशी योगात ही अनुभूती करू शकत नसेल, तर असे पवित्र योगी आपल्या डोळ्यांतून निघणाऱ्या तरंगांनी त्यांनाही परमेश्वराप्रती भावविभोर करू शकतात. साधक मग आत्मिक स्थिती, परमात्म प्रेमाचा अनुभव सहज करू शकतात. सुख-शांती-आनंदाच्या अनुभूतीत ते ही देहभान विसरू शकतील. त्या मनुष्याची कमजोर स्थिती याद्वारे शक्तिशाली बनत जाईल.

तर सांगायचं तात्पर्य, ब्रह्माकुमारीजमध्ये अशा प्रकारची दृष्टि (भावा-बहिणींना) देण्यामागचं हेच कारण आहे. आणि वातावरणातील पवित्र लहरी पकडण्यासाठी म्हणून राजयोगाचा अभ्यास, ध्यानधारणा डोळे उघडे ठेवून करतात, ह्यानेच परमात्म्याच्या सुख-शांतीचे सर्वशक्तीचे तरंग पण आपण अनुभवू शकू.

***

(पृष्ठ क्र.१९ वरुन)

ठेवत.'' परीचे सांगणे राधेने पुन्हा सुरू केले, ह्या सर्व गोष्टी समजण्यासाठी तू खूप लहान आहेस. आज सर्वत्र मनुष्य संसाराचा गाडा हा गाढवासारखा ओढत असतो, वाघासारखा हिंसक बनला आहे. एकमेकांवर अत्याचार जुलूम करतो आहे. किड्या मुंगीसारखं जीवन जगत आहे. या सर्व पाप कर्माची फळे तो मनुष्य योनीतच भोगतो. मनुष्य हा पशुसारखा वागत आहे. कर्माची फळे भोगण्यासाठी त्याला पशु पक्षाचे रूप घ्यायची गरज नाही. काही लोक आंधळे असतात लुळे लंगडे पांगळे असतात. अन्नासाठी दारोदार फिरतात भीक मागतात. हे सर्व काही गतजन्माच्या केलेल्या पाप कर्माची फळ ते भोगत असतात. महाभारतात सुद्धा मनुष्य, मनुष्याच्या जन्माला येतो हे स्पष्ट लिहिलेलं आहे. शिखंडी ही पूर्वजन्मी अंबा होती. व द्रौपदी ही पूर्व जन्मी शिवभक्त होती तपस्या करून तिने शिवाला प्रसन्न करून घेतले होते व त्यांच्याकडून वरदान सुद्धा मिळवले. यशोदा, देवकी, नंद या सर्वांची पूर्व जन्माची कहाणी सांगतात. यावरून असे सिद्ध होतं की मनुष्य पूर्वजन्मी मनुष्य होते.'' राधा आणि काकूंचे संवाद चालले असताना माझ्याही मनांत संत नामदेवांचा अभंग घोळत होता.

झाड जाणावे फुले
मानस जाणावे बोले अन्
भोग जाणावे केले जन्मांतरीचे

''मनुष्यात्मा ८४ लाख योनी जन्म घेत नाही, जसे बीज तसे फळ'', मी म्हणाले. आता काकूंच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते, ''तुझ्या परीचे म्हणणे आता मला पटू लागलेय'', काकू म्हणाल्या. ''राधा मनुष्याला सुधारण्यासाठी पशु पक्षाचा जन्म नाही तर त्याला योग्य ती समज व ज्ञान मिळाल्यानंतरच त्याची सुधारणा होते हे पटतंय.'' राधा पुन्हा परीचे मुद्दे सांगू लागली, ''आधी सांगितल्याप्रमाणे आपण आंब्याची कोय जमिनीत पेरतो तर, त्याला आंबेच लागतात जसे बीज तसे फळ! हे बरोबर मला समजलं'', काकू म्हणाल्या. काकूंच्या जवळ जात म्हणाले, ताई आपण पेरतो तेच उगवतं. त्याप्रमाणे सुख द्याल सुख मिळेल. दुःख द्याल तर दुःख मिळेल. यासाठीच आपण निरंतर परमेश्वराची आठवण करत प्रत्येक कर्म करत राहणे आवश्यक आहे. सुंदर विचार आचरणात आणले, तर आपण या जन्मात सुखी राहू आणि पुढेही आपल्याला चांगला जन्म मिळेल.'' नंदिनीची आई लगेच म्हणाली, ''तुमचं अगदी बरोबर आहे ताई! हे सर्व मला काही माहीत नव्हतं; पण राधाच्या स्वप्नामुळे मला हे सर्व काही समजलं.'' ''राधा तुला खूप खूप धन्यवाद आणि तुझ्या परीला सुद्धा सांग'', असं म्हणत काकू घरी निघून गेल्या. मी आणि राधा बाबांची आठवण करून शांतपणे आपापल्या उद्योगाला लागलो.

***



रोजचे महाभारत

ब्र.कु. बाळू, सोलापूर

ह्या घोर कलियुगात माणसाच्या जीवनाने युद्धाचे रूप घेतलेले आहे. दर दिवशी माणूस आपले हे जीवन सुखी, समृद्ध आणि आरामदायी करण्यासाठी म्हणून मनोयुद्ध रूपी आटापिटा करून विजयी होण्यासाठी धडपड करताना दिसून येतो. पण ह्या सर्वांमध्ये चुकीचे धागेदोरे पकडल्याने त्याला विजयापेक्षा हारल्याचाच जास्त अनुभव करावा लागतोय.

आपणा सर्वांना हे ज्ञात आहे महाभारताच्या युद्धाच्या वेळी दुर्योधनाने श्रीकृष्णाकडून त्याची सर्व सेना मागून घेतली आणि अर्जुनाने मात्र नि:शस्त्र कृष्णास आपला सारथी म्हणून निवडले. आणि मग ह्याचा परिणाम आपण सर्वजण जाणतोच की नि:शस्त्र असून देखील श्रीकृष्णाने पांडवांना विजय मिळवून दिला व दुर्योधनाला मात्र हार पत्करावी लागली. ह्यात हारण्याचं कारण दिसून येते, की दुर्योधनाने परमेश्वरापेक्षा सैन्याला जास्त महत्त्व देऊन परमेश्वरी आधार नकोसा केला.

आज जवळपास प्रत्येक व्यक्ती त्या दुर्योधनाच्या मानसिकतेला जवळ करताना दिसतोय. ईश्वराच्या नियम, मर्यादांचे उल्लंघन करत माणूस सांसारिक आणि भौतिक शक्तींच्या बळावर जीवनरूपी महायुद्धात विजयी होऊ इच्छित आहे. ह्यावर खोलवर विचार करता असेच दिसून येते, की ईश्वराला नाकारून, आपण सर्वजण कौरवांप्रमाणे आपल्याच विनाशाला कारणीभूत ठरतोय. फक्त भौतिक प्राप्तीपर्यंत न थांबून परमात्म पित्याला आपला (मित्र) सखा सारथी आणि नावाडी ह्या रूपात आपलेसे केले तर तो जीवनाच्या युद्धभूमीत शेवटी विजयी बनेल.

सांसारिक सुखांचा उपभोग घेण्याची तीव्र इच्छा आपल्यामध्ये इतकी बळावली आहे, की आपण (सर्वजण) सर्वच ईश्वरी नियम, मर्यादारूपी लक्ष्मण रेषा ओलांडून अनेक प्रकारची पापे उघड करतो. मग ५ विकारांच्या दुष्प्रभावांनी ग्रासलेल्या ह्या अधिभौतिक शक्तींचे लांबलचक साम्राज्य वसवू लागतो. दुर्योधन, रावण, सिकंदर ह्यांसारख्या अनेक लोकांनी ह्याच मार्गावर चालण्याची चूक केली आणि शेवटी त्यांच्या जीवनात पश्चात्तापाशिवाय काहीच उरले नाही.

आपण अधिभौतिक शक्तीमध्ये (भौतिक संपदा) त्याच्या आकर्षणापायी इतके आंधळे झालो आहोत की, संपूर्ण जगाचा नियंता जो सर्वशक्तीवान परमपिता परमात्मा आहे, त्याची आठवणच बुद्धीतून विसरत चाललेलो आहोत. अहंकारात काठोकाठ बुडालेले असे लोक स्वत:च्या जीवनात कितीही प्राप्ती करू देत, पण त्यांच्या सर्व प्राप्ती विनाशी आहेत. वैभवयुक्त सांसारिक साधन-संपत्तीचा उपभोग घेण्याच्या तीव्र इच्छे पोटी आपण ईश्वरी सत्तेकडे चक्क कानाडोळा करतो. संपूर्ण आयुष्यभर दु:ख, कष्ट, अनारोग्य, राग-द्वेष, रडणे-कुढणे ह्यांसारख्या नकारात्मक परिस्थिती उद्भवतात.

परमेश्वराबद्दल असलेल्या श्रद्धेला दुय्यम मानल्यामुळे येणाऱ्या संकटांवर मात करण्यासाठी आपण सांसारिक शक्तीकडे आकर्षित होतो. समस्या तर संपत नाहीतच; पण उलटपक्षी जीवनातून उत्साह, मनोधैर्य आणि आत्मिक बळच नाहीसे होऊ लागते.

वैश्विक नाट्याच्या ह्या मंचावर घडणाऱ्या सर्व घटना आपल्याच कर्माच्या फळाच्या रूपाने वेळोवेळी आपोआपच समोर येतात. आपल्या ह्या कर्माच्या हिशोबात दुसरी कुणीही व्यक्ती अथवा परिस्थिती जबाबदार नसते आणि म्हणूनच संपूर्ण विश्वास ठेवूनच आपण ह्या परिस्थितीवर मात करू शकू हे नक्की.

ते मान्य करून जर आपले जीवनमान व्यतीत केले, तर निर्बंधन, निर्विघ्न, सफल आणि सुखी जीवन साकारता

(पृष्ठ क्र.२८ वर)

प्रभुप्रेम म्हणजेच राजयोग

ब्र.कु. सचिन, ग्लोबल हॉस्पिटल मा. आबू

प्रभुप्रेमाच्या अनेकानेक परिभाषा आहेत. एक परिभाषा म्हणजे ईश्वराने दिलेल्या ज्ञानावर निरतिशय प्रेम. तर दुसरी परिभाषा बाबांवर अर्थात ईश्वरावर प्रेम त्यांनी शिकवलेल्या राजयोगावर प्रेम. परमात्म प्रेमाची ही दुसरी परिभाषा आहे. बाबांनी जो राजयोग शिकवला, जो विधी शिकविला त्या राजयोगावर प्रेम. आपले किती प्रेम आहे त्या योगावर? आपल्याला किती वाटते उद्याची अमृतवेळा (ब्राह्ममुहूर्त) आजपर्यंत कधी झाली नाही अशी व्हावी? सकाळी जेव्हा अवघे विश्व गाढ झोपेत आहे, अशा नीरव शांततेत उठून शरीरापासून अलिप्त होऊन जायचे. आजपर्यंत जन्मोजन्मी आपण इंद्रियांचे सुख उपभोगत आलो; पण अतींद्रिय सुखाचा अनुभव इतके वर्षात किती तास किंवा कदाचित किती क्षण करू शकलो ?

ज्यांची अमृतवेळा शक्तिशाली त्यांचा पूर्ण दिवस शक्तिशाली आणि ज्यांची अमृतवेळा शक्तिशाली नाही त्यांचा संपूर्ण दिवस शक्तिहीन जातो. अमृतवेला नावाचे पुस्तक आपल्या साहित्य विभागात उपलब्ध आहे. ते सर्वांनी अवश्य घेऊन जावे. ज्यांनी आधी वाचले आहे, त्यांनी परत वाचायला सुरवात करावी. दिवसातून एकदाच नाही तर एकदा सकाळी, एकदा रात्री वाचावे. आपल्याला जे करायचे आहे ते पहिल्यांदा नीट जाणून घेतले पाहिजे, शिकण्याचा योग्य विधी जाणून घेतला पाहिजे. कोण-कोणत्या समस्या येतात, एखाद्या दिवशी आपण अमृतवेळेला का उठू शकत नाही? उठलोच तर आज वेगळ्या वेळेला उद्या वेगळ्या वेळेला का जाग येते? एकाग्रता का होऊ शकत नाही? सातत्य का राहत नाही? परमात्म मिलन एक आनंदमय, एकरस उत्सव बनला पाहिजे. पहाटे जाग येताच प्रभू मिलनाची वेळ, आज परत आपण या शरीराच्या दुनियेतून पार त्या प्रभू प्रेमाच्या दुनियेत जाणार या आठवणींनीही मन आनंदाच्या डोहात बुडून गेले पाहिजे. योगाचा कालावधी हळूहळू वाढवत गेले पाहिजे. चालता - फिरता, खाता - पिता बाबांच्या आठवणीत राहणे आवश्यक आहे. बाबा कधी म्हणतात फक्त बसून योग करायचा नाही, तर कधी बसून योग करायचा असेही सांगतात, कारण बसून जितका शक्तिशाली योग असेल तेवढी चालता - फिरता पण बाबांची आठवण आपोआपच राहील. बसून योग करायची सवय नसेल तर चालता - फिरता कशी आठवण राहील? बसून योग करणे ही पण एक साधना आहे. भक्ती मार्गात ३ तास एका जागेवर बसणे याला 'आसनजीत' म्हणतात. स्वतः समोर ध्येय ठेवा, मला इतका वेळ बसून योग करायचा आहे. तरच हळूहळू सवय होत जाईल. प्रत्येक गोष्टीची सवय लागावी लागते. जेव्हा आपण योगामध्ये बसू तेव्हा एकदम स्थिर अवस्था असावी. एक बोट काय ; पण जीभही निश्चेष्ट एकदम शांत होईल. शरीर स्थिर झाले की आत्माही स्थिर होईल, एकरस स्थिती होईल, तेव्हा योगामध्ये आनंदाची अनुभूती होईल. हे जेव्हा दिवसाच्या सुरवातीला होईल तेव्हा कितीही सेवांमध्ये व्यग्र असाल तरी निरंतर तार बाबांशी जोडलेली राहील. जेव्हा मन, बुद्धीची तार बाबांशी जोडलेली राहील, तेव्हा माया कितीही संपर्क करायचा प्रयत्न करेल तरीही तिला एकच उत्तर मिळेल, ह्या मार्गावरील सर्व क्रमांक व्यग्र आहेत.

बाबांवर प्रेम म्हणजे योगावर प्रेम, राजयोगावर प्रेम, योगाच्या अंतरंगात जाणे. काहीजण नेहमी आम्हाला विचारतात योग कसा करायचा? आम्हाला योग शिकवा. परंतु योग हा स्वतःच्या अनुभवातूनच शिकता येतो. काल योगामध्ये त्या अथांग सागराच्या किती खोलवर गेलो? ज्या अनुभूती पर्यंत पोहचलो त्या पेक्षा आज अधिक खोलवर गेलो का? रोजचा अनुभव आणखीन वाढत चालला आहे

का? अनुभवाचे लोभी बना, आणखीन पुढे, आणखीन पुढे, आणखीन पुढे जायचं थांबू नका. आपण आता खूप अनुभव केले, इकडे प्रकाश, तिकडे प्रकाश, इकडे ब्रह्मा, तिकडे स्वर्ग बघितला ..... हे काही बघायचं नाहीए. फक्त अनुभव करायचा. अनुभवांच्या खोल सागरात बुडून जायचं. अजूनतरी आपण काहीच अनुभव केला नाही. एका मुरली मध्ये बाबा म्हणतात अजून तुम्ही लहान मुलेच आहात. अजून तुम्हाला काहीच कळले नाही. आता करूया, आता मिळवूया. उद्याची अमृतवेळा अशी असेल जणू आजपर्यंत अशी कधी झाली नाही. योगाची वेळ वाढवा, त्याची गुणवत्ता वाढवा, एकाग्रता वाढवा, शरीराच्या स्थिर स्थितीत प्रगती होऊ द्या, बाबांवरच्या प्रेमालाही वाढवाच, त्या प्रेमात आकंठ बुडून जाण्याचा अनुभव वाढवा, अशरीरी स्थितीचा अभ्यास वाढवा, साक्षी होऊन बघा असे आहे प्रभू प्रेम.

भावानुवाद : ब्र.कु. विद्या ठाणे

(पृष्ठ क्र.२६ वरुन)
येईल. सकल विश्वात बघितले तर 'कर्म' हेच मुख्य मानले जाते, अशा ह्या कर्माच्या आधारावरच जीवन जगण्यासाठीची सर्व सुख-साधने एकत्र येऊ शकतील. मनात - बुद्धित सदोदित हाच प्रश्न घोळत असावा, की परमात्मा माझ्याकडून कोणती कर्मे (काम) करू पाहतोय बरे? माझी कामे (कर्मे) परमात्म-इच्छेनुसारच होत आहेत का? ह्या प्रश्नाचा सतत मागोवा घेत असावे.

श्रीमद् भगवत गीतेमध्ये हाच उपदेश दिलाय की ईश्वरी इच्छेलाच स्वइच्छा समजून कर्म करीत राहिल्यास अर्जुनाने मिळवलेला विजय तुम्हालाही सहज साध्य होईल. परमात्म इच्छेला शिरोधार्य मानून, महत्त्व देत कर्म करणारा मानव 'त्या'च्या (ईश्वराच्या) पवित्र हृदयात सहज स्थान मिळवू शकतो ('त्या'चे मन जिंकू शकतो.) त्याचबरोबर स्वत:चे भौतिक जीवन देखील अति भव्य-दिव्य, अति श्रेष्ठ आणि महान बनवू शकेल. आपली सर्वच लहान-मोठी कामं जर ईश्वरार्पणम् करून केली, तर सर्वच दु:खातून आपली सहजच मुक्तता होईल. कारण असे केल्याने आपल्या प्रत्येक कर्माची जबाबदारी 'त्या'च्यावर असते. त्याच्या आठवणीत प्रत्येक काम हे सुकर होत जाते.

परंतु दु:ख ह्याच गोष्टीचं आहे, की हे सर्व जाणूनही आपण सर्वचजण महाभारतातील त्या दुर्योधनासारखे अहंकाराचा चैतन्य पुतळा होऊन परमेश्वरी आज्ञांचा स्वीकार करण्यास तयार होत नाहीच, परंतु आपल्याच अशक्त खांद्यांवर दु:ख, अशांती, चिंता, कलह, क्लेष, पराभव, रोग-शोक ह्यांसारखी नकारात्मकतेची ओझी उचलत खुरडत जगतोय, घुसमटत जगतोय. मनात अतीव दु:खाची परिसीमा गाठली जातेय, त्या दु:खाचं-अशांतीच कारण नक्की माहीत असूनही आपण ते स्वीकारायचे टाळतोय. आपल्याच अहंकारात बुडून जाऊन परमेश्वरी इच्छेच्या विरूद्ध कर्म केल्यास सुख-शांती-आनंदाची अनुभूती कदापि होणे शक्य नाही.

पुराणातील कथा-कहाण्यावरून आपणा सर्वांना हे कळून चुकले आहे. स्वत:ला अति शक्तीशाली, बलाढ्य, शूरवीर सैनिक (योद्धे) समजणारे रावण, कंस, हिरण्यकश्यपू, दुर्योधन हे आणि अनेकानेक अहंकारी लोकांनी ईश्वरी सत्तेला आव्हान देऊन हिंसात्मक कर्म केल्याने त्यांचा अंतही तसाच दुर्दैवी झाला. आपल्या संस्कारात जन्मोजन्मी जो अहंकार, वासना, राग-द्वेष - इ. विषय विकार वसलेत ते मुळापासून उखडून टाका. हाच सुखी - विजयी जीवनाचा मूलमंत्र म्हणता येईल.

ह्याच सर्व कारणांमुळे आता आपल्याला आपला जीवनरूपी रथ त्या सृष्टि नियंत्याच्या (ईश्वराच्या) हाती सोपवून विजय-यात्रेसाठी सिद्ध व्हावे लागेल. नेहमी हीच आठवण राहावी, की माझ्या मन मंदिरात साक्षात् ईश्वर वसला (स्थानापन्न) आहे. तो माझ्या जीवनरूपी रथाचे सारथ्य करतो आहे. आपला प्रत्येक श्वासोच्छवास 'त्या'च्याच आठवणीत, प्रेमात चिंब भिजावं (ओथंबून जावे) तेव्हाच आपण ५ विकारांच्या विरुद्ध जे महाभारतरूपी मनोयुद्ध चालू आहे, त्यात संपूर्ण यशस्वी होऊन सफळ-संपूर्ण जीवन सहज साकारू शकू.

***

शांतीवन (आबू रोड) : राजयोगिनी ब्र.कु. रतनमोहिनी दादींकडून ईश्वरी भेटवस्तू स्वीकारताना आमदार भ्रा. गणेश नाईक, ब्र.कु. शीला व ब्र.कु. भावना

पाटण (सातारा) : सेवाकेंद्राचे अवलोकन केल्यानंतर मानिनी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण, ब्र.कु. शोभा, ब्र.कु. विद्या व ब्र.कु. शशिकांत

पुणे (रविवार पेठ) : वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार भ्रा. रवींद्र धंगेकर, ब्र.कु. दशरथ भाई, ब्र.कु. रुक्मिणी व ब्र.कु. रोहिणी

वर्धा : आंतरराष्ट्रीय शांती दिवसानिमित्त कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करताना इनर व्हीलच्या अध्यक्षा गीता राऊत, सचिव सुषमा नागपुरे, व्हाईस प्रेसिडेंट सिंधू गोयंका, ब्र.कु. अपर्णा, ब्र.कु. रेणू

धडगाव (नंदुरबार) : आमदार भ्रा. राजेश पाडवी यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सरिता

शांतीवन (आबू रोड) : : संस्थेच्या संयुक्त मुख्य प्रशासिका राजयोगिनी ब्र.कु. मुन्नीदीदींच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त दीप प्रज्ज्वलन करताना

शांतीवन (आबू रोड) : : संस्थेचे सेक्रेटरी जनरल राजयोगी ब्र.कु. निर्वैर भाईच्या ८५व्या वाढदिवसानिमित्त केक कापताना

मुलुंड : दीपावली निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्ज्वलन करताना राजयोगिनी ब्र.कु. गोदावरी दीदी, ब्र.कु. लाजवंती, ब्र.कु. सरला, ब्र.कु. जानकी, ब्र.कु. रेखा व अन्य

ठाणे चेकनाका : दीपावली निमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सरला, ब्र.कु. ज्योत्स्ना व अन्य

माहीम : दीपावली निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन ब्र.कु. मीरा दीदी, ब्र.कु. उज्वला व अन्य